cmyk

## संपादकीय

### एकत्रीकरणाची बोलणी कमी अन् संभ्रमच अधिक

सोमवारी पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट यांचे वर्धापनदिन मेळावे झाले. या मेळाव्यात जी भाषणे झाली, सोशल मीडियावर जी स्टेटस शेअर झाली आणि जे समोर आले त्याचे वर्णन संभ्रम असेच करावे लागेल. या दोन्ही मेळाव्यातून जनतेच्या समोर केवळ आणि केवळ संभ्रम चितारला गेला आहे. मोठे पवार इतिहास सांगत आहेत, धाकटे पवार सत्ता हेच सर्वस्व हे सुत्र सिद्ध करत आहेत.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### तुळजाभवानी मंदिर संस्थानाकडून ८ पुजाऱ्यांना नोटीस

तूळजापूर : श्री तुळजाभवानी मंदिर परिसरात तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करून थुंकणाऱ्या ८ पुजाऱ्यांवर मंदिर संस्थानने कडक कारवाईची भूमिका घेतली आहे. मंदिराच्या शिस्तीला बाधा निर्माण करणाऱ्या अशोभनीय वर्तनामुळे संबंधित पुजाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून, तीन महिन्यांसाठी मंदिरप्रवेश बंदीची कारवाई होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. संबंधित पुजाऱ्यांनी मंदिर परिसरात तंबाखूजन्य पदार्थ खाऊन थुंकल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये स्पष्टपणे आढळून आले आहे. यामुळे मंदिर प्रशासनाने तातडीने दखल घेत, देऊळ कवायत कलम २४ आणि २५ अन्वये संबंधितांवर नोटीस बजावली आहे.


बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–५० | शुक्रवार, दि.१३ जुन २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


# खरिपाच्या तोंडावर शेतकऱ्यांची कोंडी

## सरकारचे मोफत वीजचे आश्वासन वाऱ्यावर, महावितरणकडून थकीत वीजबिलासाठी तगादा

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यात शेतकऱ्यांकडून कृषी पंपाच्या थकीत वीजबिलाची वसूली सुरू करण्यात आली आहे. त्यासाठी महावितरणकडून शेतकऱ्यांना फोन कॉल आणि मेसेजवरून वीजबिलाची थकबाकी भरण्याचा तगादा लावला जात आहे. थकबाकी भरली नाही तर कृषीपंपाचा वीज पुरवठा बंद केला जाईल, असा इशारा देण्यात येत आहे. त्यामुळे ऐन खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांची कोंडी झाली आहे.**



राज्यात १ एप्रिल २०२४ पासून मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना राबवली जाते. या योजनेंतर्गत राज्यातील ४४.३ लाख ७.५ एचपीपर्यंतच्या कृषी पंपासाठी मोफत वीज देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेची अंमलबजावणी पुढील पाच वर्ष राज्यात करण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी मोफत वीज मिळत आहे. परंतु कृषी पंपाच्या वीजबिलाची थकबाकी वसूल करण्यासाठी महावितरणकडून शेतकऱ्यांकडे तगादा लावण्यात येत आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कृषीपंपांना मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला, त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी थकीत वीजबिल वसूल करणार नाही, अशी ग्वाही दिली होती. परंतु आता मात्र राज्य सरकारकडून महावितरणने थकीत वीजबिलाची वसूली सुरू केली आहे. त्यामुळे मोफत ◄◄ पान २ वर

### आठ तासही वीज मिळत नाही

शेतकऱ्यांना मोफत वीज देऊन उपकार केल्याची भावना मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री दाखवत आहेत. परंतु राज्यातील शेतकऱ्यांना आठ ते दहा तासही वीज पुरवठा केला जात नाही. मात्र तरीही जादाचे युनिट्सचा वापर दाखवून शेतकऱ्यांवर वीजबबिलाची थकबाकी दाखवली जाते. शेतकऱ्यांना अव्वाची सव्वा बील दिले जातात. त्यामुळे शेतकरी वीजबील भरत नाहीत, असे जाणकार सांगताना दिसतात.

## थोडक्यात...

### उदय सामंतांच्या भेटीनंतर संदीप देशपांडे 'शिवतीर्थावर'

मुंबई–उदय सामंतांच्या भेटीनंतर संदीप देशपांडे राज ठाकरेंच्या 'शिवतीर्थावर' गेले होते. तसेच फडणवीस आणि राज ठाकरे यांच्यात नेमकी काय चर्चा झाली याची कल्पना नसल्याचेही संदीप देशपांडे यांनी म्हटले आहे.

### राजू शेट्टींनी घेतली बच्चू कडूंची भेट

अमरावती– बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी उपोषण स्थळी दाखल झाले होते. यावेळी दोघांमध्ये बराच वेळ चर्चा झाली. बच्चू कडू यांची प्रकृती खालावल्याने तपासणी करण्यासाठी वैद्यकीय पथकही यावेळी दाखल झाले होते.

### विधानसभेत मविआला सत्ता मिळणार होती– संजय राऊत

मुंबई–विधानसभेत मविआला सत्ता मिळणार होती, विधानसभा निवडणुकीबाबत राहुल गांधी बोलतात तेच खरं असून मविआत जागावाटपात काही जागांवर तेढ निर्माण झाला होता. त्याचा फटका बसला असे वक्तव्य संजय राऊत यांनी केले आहे.

### ३० हजार परिचारिका १ जुलैपासून बेमुदत संपावर

मुंबई : राज्यातील ३० हजार परिचारिका १ जुलैपासून बेमुदत संपावर जाणार आहेत. विविध प्रलंबित मागण्यांसाठी या परिचारिकांनी थेट संपाचा इशारा दिलाय. त्यामुळे राज्य सरकारच्या सर्व रुग्णालयांतील आरोग्यसेवा कोलमडण्याची शक्यता आहे.. कंत्राटी पद्धतीनं परिचारिकांची नियुक्ती आणि सातव्या वेतन आयोगात स्टाफ नर्सेसकडे दुर्लक्ष झाल्याच्या निषेधार्थ हा संप पुकारण्यात आला आहे.

### पीकविमा योजनेचा हप्ता लवकरच मिळणार

मुंबई : पंतप्रधान खरीप पीक विमा योजनेत ७ हजार ६०० कोटी रुपयांचा एकूण विमा हप्ता कंपन्यांना देण्यात येणार आहे. राज्य सरकारकडून आतापर्यंत सुमारे ६ हजार ५८४ कोटी रुपये अदा करण्यात आले आहेत. शेवटचा १ हजार कोटी रुपयांचा हप्ता येत्या दोन ते तीन दिवसात कंपन्यांकडे जमा होणार आहे. कंपन्यांकडून राज्य सरकारला सुमारे २ हजार ३०० कोटींचा परतावा मिळणार आहे.

### आषाढी यात्रेसाठी एसटीच्या ५२०० विशेष गाड्या

पंढरपूर : आषाढी एकादशीनिमित्त लाखो भाविकांसाठी एसटी महामंडळाने ५ हजार २०० विशेष गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. ग्रुप बुकिंग केल्यास तुमच्या गावातून थेट पंढरपूर अशी सेवाही एसटी महामंडळाकडून दिली जाणार आहे. या प्रवासातदेखील ७५ वर्षांवरील ज्येष्ठांना मोफत प्रवास करता येणार आहे. यात्राकाळात पंढरपूर येथे प्रवाशांच्या सोयीसाठी चंद्रभागा, भीमा, पांडुरंग विठ्ठल कारखाना यात्रा स्थानक अशी चार तात्पुरती स्थानके उभारण्याचा निर्णयही एसटी महामंडळाने घेतला आहे.

### देशात कोरोनाचे ७ हजार १२१ रुग्ण

नवी दिल्ली : देशात कोरोनाच्या रुग्णसंख्येत झपाट्याने वाढ झाली असून कोरोनाचे देशात ७ हजार १२१ रुग्ण आढळून आले आहेत. दिल्लीत गेल्या २४ तासात ६६ जणांना कोरोनाची लागण झाली असून कोरोनामुळे देशभरात आतापर्यंत ७४ जणांचा मृत्यू झाला आहे.

### १४ जूननंतर राज्यात सर्वदूर पावसाचा अंदाज

पुणे : दोन आठवडे उघडीप दिलेला मान्सूनबाबत गुड न्यूज आहे. राज्यात मान्सूनच्या वाटचालीसाठी पोषक वातावरण तयार होत असून पुढील ३ ते ४ दिवस बहुतांश भागात पावसाचा इशारा देण्यात आला तर १४ जूननंतर राज्यात सर्वदूर पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. ३० जूनपर्यंत राज्यात चांगल्या पावसाची शक्यता आहे.

# अहमदाबादेत इअर इंडियाच्या विमानाचा भिषण अपघात

## २४१ पेक्षा अधिक प्रवाशांचा मृत्यू, महाराष्ट्रातील सहा जणांचा समावेश

**अहमदाबाद । वृत्तसंस्था**

**अहमदाबादहून लंडनकडे जाणाऱ्या एअर इंडियाच्या प्रवासी विमानाचा गुरूवारी दुपारी मेघानीनगर परिसरात भिषण अपघात झाला. हे बोईंग ७८७ ड्रीमलायनर विमान सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून उड्डाण केल्यानंतर काही वेळातच अपघात झाला. अपघातानंतर मोठा स्फोट झाला. एअर इंडियाच्या या विमानातून २४२ जण प्रवास करीत होते. या दुर्घटनेत दोनशेहून अधिक प्रवाशांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासनाने व बचाव पथकांनी घटनास्थळी धाव घेत मदतीला सुरुवात केली. दरम्यान, एक प्रवासी जखमी अवस्थेत सापडला असून, त्याच्यावर उपचार सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे.**

गुजरातमधील अहमदाबाद विमान दुर्घटनेचा व्हिडिओ समोर आला अन् अनेकांच्या काळजाचा ठोका चुकला. २४२ प्रवाशांसह अहमदाबादच्या सरदार वल्लभभाई पटेल विमानतळावरुन लंडनसाठी उड्डाण घेतलेले विमान अवघ्या ७ मिनिटांत खाली कोसळले. एअर इंडियाचे हे विमान अहमदाबादवरुन लंडनकडे निघाले होते. दुपारी १ वाजून ३१ मिनिटांनी विमानाने लंडनसाठी उड्डाण केल्यानंतर अवघ्या ७ मिनिटात हे विमान कोसळले. विमानाने हवेत टेक ऑफ केल्यानंतर जवळच असलेल्या मेघानी नगर या दाट लोकवस्तीच्या भागात जाऊन हे विमान कोसळले. या विमानात १२ क्रू मेंबर्स आणि २३० प्रवासी प्रवास करत होते. क्रू मेंबर्समध्ये मुंबईकर अपर्णा महाडिक या सुद्धा होत्या. अपर्णा महाडिक या राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार सुनील तटकरेंचे यांचे भाचे अमोल यांच्या पत्नी होत्या.





### मृतात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यांचा समावेश



या विमानात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी हे देखील प्रवास करत होते. त्यांचाही या दुर्दैव घटनेत मृत्यू झाला आहे. रूपाणी यांनी २०१३ मध्ये नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात गुजरात म्युनिसिपल फायनान्स बोर्डचे चेअरमन म्हणून काम पाहिले. २०१४ मध्ये त्यांनी राजकोट वेस्ट मतदारसंघातून आमदारकीची निवडणूक जिंकली. त्याच वर्षी आनंदीबेन पटेल यांच्या सरकारमध्ये त्यांना परिवहन मंत्री बनवण्यात आले. २०१६ मध्ये ते गुजरात भाजपचे अध्यक्ष झाले. ७ ऑगस्ट २०१६ रोजी ते गुजरातचे मुख्यमंत्री झाले. २०१७ मध्ये भाजपने गुजरातमध्ये निवडणूक जिंकली आणि विजय रूपाणी यांना पुन्हा मुख्यमंत्री पद देण्यात आले. रूपाणी यांच्या निधनाने सर्वत्र शोक व्यक्त करण्यात येत आहे.

एअर इंडियाच्या दुर्घटनाग्रस्त विमानातील एकूण २४२ प्रवाशांमध्ये, १६९ भारतीय प्रवासी, ५३ ब्रिटीश नागरिक, पोर्तुगालचे ७ आणि कॅनडाचा एक नागरिक प्रवास करत होते, अशी माहिती समोर आली आहे. दुर्घटनेनंतर विमानातील प्रवाशांच्या नातेवाईकांनी ◄◄ पान २ वर

### वैमानिकाचा मेड कॉल; पण त्यानंतर प्रतिसाद नाही

डीजीसीएच्या माहितीनुसार, लंडनला जाणाऱ्या एअर इंडियाच्या फ्लाइट १७१ या विमानाचे कॅप्टन सुमित सभरवाल होते. त्यांच्यासोबत सहवैमानिक क्लाइव्ह कुंदर हे को–पायलट होते. कॅप्टन सभरवाल यांचा विमान उड्डाणाचा ८२०० तासांचा अनुभव होता. तर सहवैमानिक कुंदर यांचा ११०० तासांचा अनुभव होता. विमानाने टेकऑफनंतर लगेचच एअर ट्रॅफिक कंट्रोलला मेडे असा कॉल दिला. मात्र, त्यानंतर एअर ट्रॅफिकच्या कोणत्याही कॉलला प्रतिसाद दिला गेला नाही, अशी माहिती समोर आली आहे.

### टाटा ग्रुपकडून मृतांच्या वारसांना प्रत्येकी १ कोटींची मदत

एअर इंडिया ही कंपनी टाटा ग्रुपने घेतल्याने या विमान दुर्घटनेनंतर टाटा ग्रुपकडूनही दु:ख व्यक्त करण्यात आले आहे. अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारत आणि सामाजिक जाणीव ठेऊन टाटा ग्रुपने विमान दुर्घटनेत जीव गमावलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या कुटुंबीयांना १ कोटी रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. तसेच, जखमींचा वैद्यकीय खर्च देखील टाटा ग्रुपकडूनच करण्यात येणार असून, आवश्यक ती सर्व काळजी आणि मदत जखमींना मिळेल, असे टाटा ग्रुपने म्हटले आहे. तर, विमान अपघातात कोसळलेल्या अहमदाबादमधील बीजे मेडिकल कॉलेजच्या वसतिगृहाच्या बांधकामात मदत करण्याचे आश्वासनही टाटा ग्रुपचे प्रमुख एन. चंद्रशेखरन यांच्याकडून देण्यात आले आहे.

### दैव बलवत्तर म्हणून एक प्रवासी वाचला

अपघात ग्रस्त विमानामधील जवळपास २४१ प्रवाशांचा मृत्यू झाला असून दैव बलवत्तर म्हणून यातील सीट क्र.११ ए वरील एक प्रवासी वाचला आहे. या प्रवाशाचे नाव रमेश विश्वास कुमार असे आहे.

# ठाकरे सेनेचे राष्ट्रीय महामार्गावर जनआंदोलन

## जनसामान्यांची फसवणूक करणारे सरकार–उल्हास गिराम

**बीड । प्रतिनिधी**



आघाडी सरकारला त्यांच्याच फसव्या घोषणाची आठवण करून देण्यासाठी दि. १२ जून रोजी विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते आंबादास दानवे यांच्या आदेशानुसार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिक व शेतकऱ्यांनी बीड शहर बायपास वरील महामार्गांवर रास्ता रोको आंदोलन केले. क्या हुवा तेरा वादा? अशा घोषणा यावेळी शिवसैनिकांनी दिल्या. तसेच हे सरकार जनसामान्यांना फसवणारे असल्याचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी म्हटले आहे. शेतकऱ्यांना कर्ज मुक्त करून, शेतकरी सन्मान ◄◄ पान २ वर

# बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र पोहीचादेव देवस्थानला साडेचार कोटींचा निधी

## आ.संदीप क्षीरसागरांनी मानले शासनाचे आभार

**बीड । प्रतिनिधी**

**मतदारसंघ क्षेत्रातंर्गत असलेल्या बीड तालुक्यातील कोळवाडी येथील श्रीक्षेत्र पोहीचादेव या देवस्थानच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाच्या ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत तब्बल ४ कोटी ५४ लाख ५१ हजार रूपयांचा भरघोस निधी मंजूर झाला आहे. याबद्दल बीड मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी ग्रामविकास विभाग आणि महाराष्ट्र शासनाचे आभार व्यक्त केले आहेत.**



बीड तालुक्यातील कोळवाडी येथे असलेले श्री क्षेत्र पोहीचादेव हे देवस्थान पंचक्रोशीतील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. ग्रामीण भागातील हे देवस्थान असल्यामुळे याचा विकास होणे गरजेचे होते. या भागातील नागरिकांकडून याबाबत सातत्याने मागणी होत होती. ही बाब लक्षात घेता बीड जिल्हा परिषदेकडून, तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून ◄◄ पान २ वर

# शाळेच्या पहिल्या दिवशी १०० टक्के विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके मिळणार

## गणवेश व पुष्पगुच्छ देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करा – भगवान फुलारी

**बीड । प्रतिनिधी**

**नवीन शैक्षणिक वर्ष दि.१६ जून पासून सुरू होत असून जिल्ह्यातील २४७२ जिल्हा परिषद शाळांमध्ये पहिल्याच दिवशी १०० टक्के विद्यार्थ्यांना पाठयपुस्तके, गणवेश व नवागत विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करून प्रवेशोत्सव साजरा करण्याचे**



आवाहन भगवान फुलारी, शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद, बीड यांनी केले आहे.

या बैठकीत नवीन शैक्षणिक वर्ष दि.१६ जून पासून सुरू होत असून जिल्ह्यातील २४७२ जिल्हा परिषद शाळांमध्ये पहिल्याच दिवशी नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत, शाळा व शालेय परिसर स्वच्छता करुन घेणे, पावसाळ्यात शाळांमधील वर्ग ◄◄ पान २ वर

### माजी मंत्री धनंजय मुंडे आज बीडमध्ये

**बीड । प्रतिनिधी**



राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी मंत्री तथा परळीचे आमदार धनंजय मुंडे शुक्रवारी (दि. १३) राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच नागरिकांच्या भेटीसाठी बीड शहरात येत असून ते दुपारी एक ते पाच या वेळेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालयामध्ये भेटीसाठी उपलब्ध राहणार आहेत. ◄◄ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१२ जुन २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १३०.०० क्विंटल | २,५४० | २,७३१ | २,६१९ |
| ज्वारी/हायब्रिड : ५७.०० क्विंटल | २,१७१ | ३,०१५ | २,४४१ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,२०० | २,२०० | २,२०० |
| तूर : ४.०० क्विंटल | ६,००० | ६,२५१ | ६,१२५ |
| उडीद : १.०० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| बाजरी:३६.०० क्विंटल | १,८०० | २,६०० | २,३५९ |
| मुग :१.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| सोयाबीन:१८.०० क्विंटल | ४,१०० | ४,२०० | ४,१५० |
| हरभरा: ५.५० क्विंटल | ५,२५० | ५,३४५ | ५,२९८ |

cmyk

## अग्रलेख

# एकत्रीकरणाची बोलणी कमी अन् संभ्रमच अधिक

सोमवारी पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट यांचे वर्धापनदिन मेळावे झाले. या मेळाव्यात जी भाषणे झाली, सोशल मीडियावर जी स्टेटस शेअर झाली आणि जे समोर आले त्याचे वर्णन संभ्रम असेच करावे लागेल. या दोन्ही मेळाव्यातून जनतेच्या समोर केवळ आणि केवळ संभ्रम चितारला गेला आहे. मोठे पवार इतिहास सांगत आहेत, धाकटे पवार सत्ता हेच सर्वस्व हे सुत्र सिद्ध करत आहेत. शरद पवारांसोबत जे उरले आहेत ते गुळाला चिकटलेले मुंगळे आहेत, अशी शेलकी टीका अजितदादांनी सुरु केली आहे. माध्ममासमोर दोन्ही राष्ट्रवादीचे एकत्रीकरण होणार असे चित्र गेले दोन महिने रेखाटले जाते आहे, जी गोष्ट शिवसेना व मनसे यांच्या एकत्रीकरणाची सुरु आहे तीच कथा पवारांच्या राष्ट्रवादीत सुरु आहे.

पुणे हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला मानला जात होता. लोकसभेला राष्ट्रवादीचे बरे जमले पण विधानसभा निवडणुकीत धोबीपछाड बसला. अजितदादा महायुतीसोबत होते म्हणून दंड फुगवून रोज टोप्या उडवत आहेत. शरद पवार आणि जयंत पाटील यांच्या मनात काय आहे हे नेमके स्पष्ट झालेले नाही पण अस्वस्थता लपलेली नाही. एकीकडे इंडी आघाडीशी पंगा दुसरीकडे अजित पवारांशी गाठीभेटी तर ताईचे सारखे दादा दादा करणे, मोदींनी विदेशात भारताची बाजू मांडायला पाठवलेल्या शिष्टमंडळात सहभागी होणे, शरद पवारांनी भाकरी फिरवणार, महाराष्ट्र सुरक्षित हातात देणार हे पालूपद गाताना जयंत पाटील यांना स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूका होऊपर्यंत अध्यक्षपद सांभाळायचे आदेश देणे व मग सर्वांचा विचार घेऊन तरुणांना संधी अशी पाटी लावणे, सारा संभ्रम आणि गोंधळ आहे. आमदार व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांनी गेली सात वर्षे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्षपद सांभाळले आहे. ते इकडे जाणार, तिकडे जाणार अशा वावड्या नियमित उठत आहेत. पण जयंत पाटील यांच्या तोंडात 'तुकाराम नथूराम' ही भाषा घट्ट चिकटली आहे. विधानसभा निवडणुकीत त्यांच्या पक्षाला व आघाडीला लोकांनी नाकारले त्यामुळे व त्यांना पक्षातून अंतर्गत छुपा विरोध मोठा असल्याने जयंतरावांची सांगताही येत नाही अशी अवस्था झाली आहे.

महाराष्ट्रात ठाकरे व पवार हे दोन ब्रँड होते दोन्हीचे तुकडे झाले आहेत. या पार्श्वभूमीवर या चौघांना एकत्र करून काही साधता येते का? हे तपासायचे धोरण दिसते आहे. अजितदादांची बोटे सध्या तुपात आहेत. त्यांना या ऐक्याचे काहीही पडलेले नाही आणि ठाकरे बंधूत हात कुणी पुढे करायचा, टाळी कुणी द्यायची यावरुन चर्चा सुरू आहे. अटी, शर्थी घातल्या जात आहेत पण सर्वांच्याच लक्षात आले आहे, ही अस्तित्वाची लढाई आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक जवळ येते आहे, हे लक्षात घेऊन काही मंडळी आतला डाव, बाहेरचा डाव खेळणार हे उघड आहे. पश्चिम महाराष्ट्रात काही छुप्या युत्या होतील, अशीही कुजबुज आहे. पण वर वर वेगळेच चित्र दाखवले जाते आहे. सोशल मीडियावर रोज वेगळी हवा पसरवली जाते आहे. आणि सर्वांचे उद्दिष्ट आपले कसे साधणार याकडेच आहे. दोन्ही राष्ट्रवादीचे एकत्रीकरणाबाबत सुप्रियाताई भूमिका घेतील, असे शरद पवारांनी म्हटले होते पण ताईंनी व साहेबांनी कोणताही निर्णय घेतलेला नाही व संभ्रम वाढवण्याची संधी सोडलेली नाही. त्यातच सुनील तटकरेंनी म्हटले आहे, ''निवडणुकीत आमचा स्ट्राइक रेट जास्त होता. त्यामुळे एकत्र येण्याबाबत ज्याच्या त्याचा विचार वेगळा असू शकतो. मी त्यावर अधिक बोलू इच्छित नाही.'' दुसरीकडे शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे पुण्यातील नेते प्रशांत जगताप यांनी, ''आम्ही त्यांच्याकडे जाण्याचा कोणताच प्रश्न नाही. जर त्यांनाच आमच्याकडे यायचे असेल तर त्यांनी भाजपाची साथ सोडावी आम्ही त्यांचे स्वागत करू'', असे वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाच्या दरम्यान म्हटले होते.

एकुणच मनसे व शिवसेना उद्धव ठाकरे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटात टाळी द्यायची का? इथपासून हात कुणी पुढे करायचा, यावरही मतभेद दिसत आहेत व त्यातून संभ्रम वाढताना दिसत आहे. संसदेचे अधिवेशन आणि महाराष्ट्राचे पावसाळी अधिवेशन नजीक आहे तेथे हे संभ्रम दूर होण्याची शक्यता आहे पण आजघडीला संभ्रम व त्यातून संबधिताची उंची, आवाका, आकांक्षा आणि सत्ताओढ लपून राहिलेली नाही. महाराष्ट्रातील जनतेनेही खरे खोटे ओळखले आहे. आता मुंबई कुणाची आणि ग्रामीण महाराष्ट्रात वरचढ कोण हे जेव्हा स्पष्ट होईल तेव्हाच हे सारे संभ्रम दूर होतील तूर्त रोज रिल्स येत आहेत, स्टेटस बदलले जात आहेत. राजकीय गट इकडून तिकडे, तिकडून इकडे उड्या मारत आहेत, भ्रष्टाचार, गैरव्यवहार, फसवणुकीची प्रकरणे रोज बाहेर येत आहेत, निसर्गाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे, कोटी कोटी रुपयांचे घोटाळे समोर येत आहेत. आमदारांचे सहाय्यक सहा-सात कोटीची रक्कम संकलीत करताना सापडत आहेत. कुणाला कशाचीच काही पडलेली नाही, जो तो बुंदी संपायच्या आधी पंगतीत बसायच्या नादात आहे. लोकांच्यात संभ्रम माजवून पोळी भाजण्याचे प्रयत्न त्यासाठीच सुरू आहेत.

## पायी चालण्याचे फायदे- डॉ. कु.जयश्री टेकाळे



पायी चालणे हे माणसांसाठी सर्वोत्कृष्ट औषध आहे. चांगली झोप आणि निरोगी आहारासह पायी चालणे आपल्याला पूर्णपणे डॉक्टरांना टाळण्यासाठी मदत करू शकते. दररोज नियमितपणे १५-३० मिनिटे पायी चालणे एखाद्या माणसाच्या आरोग्यातच सुधार करीत नाही, तर त्यांच्या मानसिक आरोग्यासाठी देखील फायदेशीर आहे. सध्याच्या धकाधकीच्या आणि व्यस्त जीवन शैलीत आपण जास्त पायी चालत नाही. परंतु आपल्याला पायी चालण्यासाठी दररोज काही वेळ काढायला पाहिजे. कारण ह्याचे आरोग्यासाठी बरेच फायदे आहे, हे आपल्याला बऱ्याच आजाराशी लढण्यात मदत करतो. दररोज ३० मिनिटे पायी चालण्याचे फायदे जाणून घेऊया.

मेंदूत सकारात्मक बदल होतात : दररोज नियमितपणे पायी चालणे मेंदूच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. कमी प्रभाव वाले एरोबिक व्यायामामुळे जसे पायी चालणे सुरुवातीच्या डिमेन्शिया किंवा स्मृती भ्रंशाला होण्यापासून रोखते, अल्झायमर सारख्या रोगाचा धोका कमी करतं. एकंदरीत मानसिक आरोग्य सुधारतो.

**हृदयरोगाचा धोका कमी करतं :** हृदय रोगाचा धोका कमी करण्या विषयी बोलावे, तर चालणे हे खूप प्रभावी ठरते. जेव्हा हृदय रोग किंवा स्ट्रोक पासून बचाव करण्याची वेळ येते, तेव्हा पायी चालणे हे धावण्यापेक्षा कमी प्रभावी नाही. ही क्रिया उच्च रक्तदाब आणि कॉलेस्ट्रालच्या पातळीला कमी करून, रक्त परिसंचरण सुधारून हृदया संबंधी समस्या टाळण्यात मदत करतात.

**फुफ्फुसांना प्रशिक्षण देतं :** पायी चालणे एक एरोबिक व्यायाम आहे, ज्यामुळे रक्त प्रवाहात ऑक्सिजनच्या प्रवाहाला वाढवतं. हे शरीरातील विषाक्त घटक आणि कचरा दूर करण्यासह फुफ्फुसाला प्रशिक्षण देण्याच्या कामात मदत देखील करतं. पायी चालण्यामुळे चांगली आणि दीर्घ श्वास घेतल्यामुळे फुफ्फुसांच्या आजाराशी संबंधित लक्षणे कमी करता येतात.

**स्वादुपिंडासाठी फायदेशीर :** व्यायामा प्रमाणेच पायी चालणे, धावण्यापेक्षा मधुमेहाला रोखण्यासाठी अधिक प्रभावी ठरतं. पायी चालणाऱ्या लोकांच्या एका गटाने ६ महिन्यांच्या प्रायोगिक कालावधीत असलेल्या धावणाऱ्याच्या गटाच्या तुलनेत ग्लूकोज सहिष्णुता मध्ये अंदाजे ६ पटीने सुधार करून दाखवले आहे.

**पचन कार्य सुधारते :** दररोज नियमितपणे ३० मिनिटे चालणे भविष्यात केवळ पोटाच्या कर्करोगाच्या धोक्याला कमी करत नाही, तर पचन आणि बद्धकोष्ठता देखील सुधारू शकते. ज्यामुळे शरीरास मल त्यागायला किंवा शरीरातील घाण नियमितपणे काढायला मदत मिळते.

**सांधे आणि हाडे बळकट बनते :** पायी चालणे सांध्यात अधिक गतिशीलता देते, हे हाडांच्या नुकसानाला रोखण्यास मदत करते. तसेच फ्रॅक्चरचा धोका देखील कमी करतं. नियमितपणे दिवसातून किमान ३० मिनिटे चालण्याने, सांध्यातील कडकपणा आणि सूज कमी करण्यात मदत होते. डॉ.कु जयश्री श्रीराम टेकाळे वैद्यकीय अधिकारी ग्रामीण रुग्णालय आष्टी

## सासरच्या जाचाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

### ट्रॅक्टर घेण्यासाठी मागितले जात होते सात लाख रुपये

शिरूर । प्रतिनिधी

**ट्रॅक्टर घेण्यासाठी माहेराहुन सात लाख रुपये घेऊन ये असे असे म्हणत पती व सासू-सासरा यांच्या कडून सातत्याने जाच होत असल्याने या जाचाला कंटाळून ३० वर्षीय महिलेनी विषप्राशन आत्महत्या केल्याची घटना शिरूर तालुक्यातील आंनदवाडी बुधवारी रात्री घडली आहे.**

शिरूर कासार तालुक्यातील वरंगळवाडी येथील रावसाहेब भाऊसाहेब पवार यांची मुलगी गया हिचा विवाह पंधरा-सोळावर्षांपूर्वी अगदी हाकेच्या अंतरावर असलेल्या आनंदवाडी येथील रहवासी असलेले लालचंद आश्रुबा शेळके यांच्याशी झाला होता. विवाहनंतर काहीदिवसातच पती लालचंद शेळके, सासू संगीता शेळके व सासरा आश्रुबा शेळके यांच्या कडून सून गया हिस माहेराहून ट्रॅक्टर घेण्यासाठी ७ लाख रुपये घेऊन ये म्हणून सातत्याने जाच केला जात होता. याच कारणावरून घरामध्ये वाद होत होता. वडिलांकडची परिस्थिती हालखीची असल्यामुळे गया ट्रॅक्टर घेण्यासाठी पैसे आणू शकत नव्हती. रोजच्या कटकटीला कंटाळून गयाने टोकाचे पाऊल उचलले. बुधवारी सकाळी शेतामध्ये काश्या (काडी कुडी) वेचण्यासाठी गेलेल्या गयाने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मात्र ही घटना लक्षात येताच तिला बीडकडे उपचारासाठी हलवले होते. बीड येथील खाजगी रुणालयामध्ये उपचार घेत असतांना उपचारा दरम्यान रात्री १० वाजण्याच्या सुमारास गयाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. गयाच्या मृत्यूची बातमी माहेरच्या नातलगाना समताच त्याच्या कडून मोठा संताप व्यक्त केला जात होता यामुळे अंत्यविधीच्या वेळी काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.सदरील घटनेची माहिती चकलंबा पोलिसांना मिळताच सपोनि.संदीप पाटील हे आपल्या फौज फाट्यासह घटनास्थळी जाऊन वाढत्या तणावाला मिटवण्याचा प्रयत्न केला.



त्यानंतरच शोकाकुल वातावरणामध्ये अंत्यविधी पार पडला. मयत गयाचे वडील रावसाहेब भाऊसाहेब पवार यांच्या फिर्यादीवरून चकलांबा पोलिसामध्ये सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास आरोपी पती लालचंद शेळके, सासू संगीता शेळके, सासरा आश्रुबा शेळके यांच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पानपाटील हे करत आहेत. मयत गया शेळके हिच्या पश्चात एक चौदा वर्षाचा व एक सात वर्षाचा अशी दोन मुले आहेत. गयाच्या या आत्महतेची सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

## गणवेशाची रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यात

पुणे । प्रतिनिधी

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत शासकीय निवासी शाळातील १८ हजार ४०० प्रवेशित विद्यार्थ्यांना शालेय गणवेश खरेदी करण्यासाठी त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट रक्कम जमा होणार आहे. यासाठी शासनाने ४ कोटी २० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे.

राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुला-मुलींसाठी प्रत्येक तालुक्यात एकअशा एकूण ३५३ शासकीय निवासी प्राथमिक शाळा सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यात १०० शासकीय प्राथमिक निवासी शाळांना मान्यता मिळाली असून, आजपर्यंत एकूण ९२ शासकीय निवासी शाळा सुरू झाल्या आहेत. या निवासी शाळांमध्ये १८ हजार ४०० विद्यार्थी प्रवेशित आहेत. निवासी शाळांमधील विद्यार्थ्यांना भोजन व इतर सोयीसुविधा मिळणार असून, शासनाकडून थेट लाभ हस्तांतरण प्रक्रियेवर भर देण्यात आला आहे. त्यानुषंगाने विविध कल्याणकारी योजनेअंतर्गत वस्तू स्वरूपात देण्यात येणाऱ्या लाभाऐवजी त्यासाठी रोख स्वरूपात थेट निधी लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे.


# मुक्या प्राण्यांचा जीव घेऊन नगरपालिका प्रशासन पाप कुठे फेडणार?

## भाजपचे ज्येष्ठ नेते नवनाथ शिराळे पाटील यांचा संतप्त सवाल

बीड । प्रतिनिधी

**शहरामध्ये ५० जनावरांची मुंडके आढळून आल्यानंतर नागरिकांमधून संतापाची लाट निर्माण झाली आहे. कोंडवाडा असताना ते बंद केल्यामुळे मुक्या प्राण्यांचे जीव घेतले जात आहेत. त्यामुळे अशा मुक्या प्राण्यांचे जीव घेऊन नगरपालिका प्रशासन पाप कुठे फेडणार आहे असा संतप्त सवाल भाजपचे ज्येष्ठ नेते नवनाथ शिराळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे उपस्थित केला आहे.**

शिराळे पाटील यांनी पुढे म्हटले आहे की, शहरामध्ये नगरपालिकेच्या वतीने खासबाग लेडी रोड बीड येथे जनावरांसाठी कोंडवाडा चालू होता तो कोंढवाडा अचानकपणे बंद नगरपालिकेने करून मुक्या जनावरांना खाटकाच्या दावणीला बांधण्याचे विडे उचलले आहेत का काय अशा प्रकारचा प्रश्न सध्या बीड शहरातील नागरिकांना पडला आहे. बीड शहरातील स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये ५० मुक्या जनावरांचे मुंडके आढळून आल्याचे वृत्त बीड शहरांमध्ये वर्तमान पत्राच्या माध्यमातून माध्यमातून पसरताच अनेक बीड शहरातील नागरिकांमधून संतापाची लाट निर्माण झाली आहे. देशामध्ये नरेंद्रभाई मोदीचे सरकार आहे आणि राज्यांमध्ये देवेंद्र भाऊ यांचे सरकार आहे परंतु बीड शहरांमध्ये अंधारे मॅडम यांचे अंधाराचे राज्य कायम आहे हे बीडकरांसाठी दुर्दैव आहे नगरपालिकेच्या वतीने जनावरांसाठी कोंडवाडा आहे त्यांच्यासाठी चाऱ्याची देखील व्यवस्था नगर प्रशासनाच्या वतीने करण्यात येते परंतु कोंडवाडा बंद करून आणि चारा जनावरांचा बंद करून नेमका नगरपालिकेने कुठला पुरुषार्थ साध्य केला आहे आणि असे निष्पाप मुक्या जनावरांचे प्राण कुठपर्यंत नगरपालिका घेऊन याचे पाप कुठे फेडणार हा देखील प्रश्न आता बीड शहरातील तमाम नागरिकांना पडला असल्याचे बीड नगरपालिकेचे माजी सभापती तथा भाजपाचे नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी दिलेल्या प्रसिद्ध पत्रकात म्हटले आहे. बीड शहरामध्ये सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे मुख्य जनावरे बिचारे रस्त्याने फिरत आहेत अचानकपणे गोभक्तांच्या गाडीच्या समोर ते येऊन आम्ही नेमके आता जायचे कुठे असा प्रश्न देखील आता गोभक्तांना मुके जनावरे विचारत आहेत. याच पार्श्वभूमीवर नवनाथ शिराळे पाटील हे बीड शहरातून प्रवास करत असताना त्यांच्या गाडीच्या समोर एक गोमाता येऊन उभा राहिले आणि आपल्या व्यथा अण्णांच्या समोर मांडू लागली. हा प्रसंग प्रत्यक्षात बिडकरांना पहावयास मिळाला म्हणून आता गोमातेचे रक्षक होण्यासाठी गोवंशाचे रक्षण होण्यासाठी भाजपाचे नेते नवनाथ शिरोळे पाटील यांनी महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री श्रीमती पंकजाताई मुंडे यांच्याकडे देखील फॅक्स द्वारे तक्रार केली आहे आणि बीड शहरातील बिघडलेली नगर प्रशासनाचे घडी पूर्वपदावर आणण्यासाठी आपण सातत्याने शासन प्रशासन दरबारी आमचे नेत्या पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून आवाज उठव व झोपलेले नगर प्रशासन हे जागे केल्याशिवाय आता आम्ही स्वस्त बसणार नसल्याचेही प्रसिद्धी पत्रकाद्वारे नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी म्हटले आहे. आंधरे मॅडम यांना स्थानिक राजकीय नेत्यांनी देखील फोन केले तर त्यांचा देखील फोन अंधारे मॅडम उचलत नाहीत, एवढा मगरूळपणा बरोबर नाही अंधारे मॅडम उघडा डोळे आणि बघा नीट बीड शहरामध्ये नेमके काय चालले आहे. कमीत कमी गोवंशासाठी तरी आपले नगर प्रशासन जागे करा आणि बीड शहरांमध्ये गल्लीबोळामध्ये गोवंश चोरण्यासाठी येणारी कसाई याची टोळी पकडून त्यांना जेरबंद करून यांच्यावर गुन्हे दाखल करून या गो हत्यारे लोकांना जेलची हवा दाखावी व बीड शहरामध्ये प्रत्येक गल्लीबोळामध्ये फिरणाऱ्या गाई आणि वासरे हे बीड नगरपालिकेच्या वतीने कोंडवाडा चालू करून त्यांना त्या ठिकाणी ठेवा आणि या होणाऱ्या गोहत्या बंद करा आणि त्यांची पूर्ण व्यवस्था करा अन्यथा बीड शहरातील तमाम नागरिक आपल्याला स्वस्थ बसू देणार नाहीत याची देखील आपण दक्षता घ्यावी असे देखील प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवण्यात आले आहे. एवढ्या मोठ्या ५० गो वंशाचे मुंडक्यामुळे बीड शहरातील तमाम नागरिकांमध्ये नगर प्रशासक सीओ नीता अंधारे मॅडम यांच्या अंधाराच्या कार्यामुळे नाराजी व्यक्त होत आहे आता तरी जिल्हाधिकारी यांनी स्वतः लक्ष घालावे आणि पंकजाताई मुंडे पशुसंवर्धन मंत्री या मुक्या जनावरांच्या बाबतीत तात्काळ दखल घेतील आणि या दोषी नगर प्रशासक यांच्यावर कारवाई करतील असी अपेक्षा ही बीड शहरातील नागरिकांमधून व्यक्त होत आहे पुढे निवेदनामध्ये नवनाथांना शिराळे पाटील यांनी म्हटले आहे की आपण जिल्हाधिकारी आणि एसपी यांना देखील आपण निवेदन या महत्त्वाच्या विषयात लक्ष घालून संबंधितावर कठोरात कठोर कारवाई करावी अशी मागणी आपण निवेदनाद्वारे करणार असल्याचेही दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नवनाथ अण्णा शिरोळे पाटील यांनी म्हटले आहे.



पान १ वरून...

### खरिपाच्या तोंडावर शेतकऱ्यांची

वीज असूनही थकबाकीदार शेतकऱ्यांवर वीज तोडणीची टांगती तलावर कायम आहे. दरम्यान, राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीज पुरवठा मिळावा, अशी मागणी शेतकरी करत आहेत. परंतु त्यावर राज्य सरकारकडून केवळ घोषणा केल्या जात आहेत, अशी तक्रार शेतकरी करत आहेत.

-----------

### अहमदाबादेत इअर इंडियाच्या

घटनास्थळावर धाव घेतली. जवळील रुग्णालयात नातेवाईकांचा आक्रोश पाहायला मिळत होता. या दुर्घटनेने अवघा देश शोकसागरात बुडाला असून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ट्विट करुन शोक व्यक्त केला. तर, ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी देखील शोक व्यक्त केला आहे. दरम्यान, नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांनी या दुर्घटनेवर तीव्र दुःख व्यक्त केले आहे. संपूर्ण यंत्रणा सतर्क आहे. मी स्वत: परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे आणि सर्व यंत्रणांना तात्काळ आणि समन्वयाने काम करण्याचे आदेश दिले आहेत, असे त्यांनी म्हटले.

----------

### बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र पोहीचादेव

या देवस्थानच्या विकासाचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला होता. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी शासनदरबारी पाठपुरावा केला होता. त्यावर आता शासनाने श्री क्षेत्र पोहीचादेव देवस्थानच्या विकासासाठी एकूण ४ कोटी ५४ लाख ५१ हजार रुपयांचा भरघोस निधी मंजूर केला आहे. एकूण निधीपैकी भक्तनिवास बांधकाम करणेसाठी १ कोटी ४० लाख रुपये, भक्त निवास बांधकाम करणेसाठी (स्त्री) १ कोटी ४० रूपये, शौचालय बांधकाम करणे (पुरूष) ५० लक्ष, शौचालय बांधकाम करणे (स्त्री) ५० लक्ष, संरक्षण भिंत बांधकाम करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे ५० लक्ष, तीर्थक्षेत्र विकास अंतर्गत विद्युत कामे करणे २४ लक्ष ५१ हजार रुपये अशाप्रकारे कामे करण्यात येणार आहेत. दरम्यान बीड मतदारसंघातील देवस्थानच्या विकासासाठी भरघोस निधी दिल्याबद्दल बीड विधानसभा मतदारसंघाच्या वतीने आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र शासनाचे आभार मानले असून यासंदर्भात आ.क्षीरसागरांच्या पाठपुराव्याला मोठे यश आले आहे. दरम्यान मतदारसंघातील सर्वच समाजाच्या तीर्थक्षेत्रांचा विकास झाला पाहिजे आणि तो करण्यासाठी आम्ही कटिबद्ध असून त्याबाबतचा सातत्यपूर्ण पाठपुरावा शासनदरबारी सुरू असल्याचे आ.संदीप क्षीरसागरांनी सांगितले.

---------------

### ठाकरे सेनेचे राष्ट्रीय महामार्गावर

योजनेतून पंधरा हजार रुपये देण्याची घोषणा, लाडक्या बहिणींना पंधराशे ऐवजी एकविशे देणार, शेतकऱ्यांना एक रुपयात पीक विमा देऊन प्रत्यक्ष खात्यावर नुकसान भरपाई देणार, वृद्ध पेन्शन धारकांना एकवीसशे रुपये देणार होते, शेतीला चोवीस तास विज, हर घर जल - हर घर छत या सारख्या शेकडो फसव्या घोषणा करून सामान्य जनता, महिला, शेतकऱ्यांची दिशाभूल करून हे सरकार सत्तेवर आले. मात्र या सरकारच्या घोषणा हवेतच विरल्या असून सरकारला घोषणांची आठवण करुन देण्यासाठी ठाकरे शिवसेनेच्या वतीने क्या हुवा तेरा वादा? म्हणत शिवसैनिक आणि शेतकऱ्यांनी बीड शहर बायपास या राष्ट्रीय महामार्गावर जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या नेतृत्वाखाली जनआंदोलन केले. यावेळी जिल्हाप्रमुख गिराम यांनी बोलताना सांगितले की, हे सरकार फसवे असून फक्त घोषणा करण्यात मग्न आहे. शेतकऱ्यांना या सरकारने वाऱ्यावर सोडले असल्याचे ते म्हणाले. यावेळी महिला जिल्हा संघटक मीराताई नवले, सोपान मोरे तालुका प्रमुख शिरूर, मुकुंद शिंदे तालुकाप्रमुख पाटोदा, अजय दाभाडे, बबलू दिवे तालुकाप्रमुख गेवराई, संजय महाद्वार, हनुमान जगताप, सुशील पिंगळे, राजू मोहाले, रतन गुजर, दीपक मोरया, अशोक हिरडे, अशोक जाधव, कृष्णा चौरे, तात्या रोडे, पंकज कुटे, अजिंक्य डोरले, रवी वाघमारे, प्रदीप कोठुळे, नयुब पठाण, दादासाहेब सोनवणे, मशरू पठाण, महादेव परस्कार, अक्षय काशीद, राम अंतापुरकर, बाळू वैद्य, सतीश मस्के, रमेश सुरवसे, सखाराम कोरडे, मच्छिंद्र काळे, हनुमान काशीद, चंदू कागदे, गोविंद शिंदे, विशाल पवार, बाळासाहेब लांडे, अशोक चव्हाण, विकास कदम, नितीन कुठे, शिंदे रावसाहेब, गणेश लोणकर, सतीश परदेशी, दिलीप पवार, रंगनाथ पैठणकर, नारायण काशीद, संतोष काशीद, बाळासाहेब, प्रतीक वाघमारे मारुती वाघचौरे, दाऊद शेख, शरद पवार, राजू गोपाळ आदी शिवसैनिक उपस्थित होते.

-------------

### माजी मंत्री धनंजय

मागील काही दिवसांमध्ये सातत्याने आजारपणाने ग्रस्त असलेले धनंजय मुंडे आता मतदारसंघासह पक्ष कार्यामध्ये कमालीचे सक्रिय झाल्याचे पाहायला मिळत आहे. बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कामकाजाच्या संदर्भाने तसेच पदाधिकारी कार्यकर्ते यांसह नागरिकांच्या भेटीसाठी धनंजय मुंडे हे शुक्रवारी बीड शहरातील मित्र नगर परिसरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयामध्ये दुपारी एक ते पाच या वेळेमध्ये उपलब्ध राहणार असून सर्व पदाधिकारी सेलचे अध्यक्ष यांचा कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष ॲड. राजेश्वर आबा चव्हाण यांनी केले आहे.

----------

### शाळेच्या पहिल्या दिवशी १०० टक्के विद्यार्थ्यांना

खोल्या पत्रे गळतीमुळे विद्यार्थ्यांना इजा होणार नाही याची दक्षता घ्यावी, यासाठी विशेष लक्ष द्यावे, शालेय पाठयपुस्तके वाटप करावे, तसेच सर्व गटशिक्षणाधिकारी यांनी १०० टक्के शाळांसाठी गणवेश दर्जेदार व वर्षभर टिकेल असा मजबूत जाडजूड अतिशय सुंदर आणि सुरेख रंग असलेला गणवेश खरेदी करावा, मोठ्या मुलींना ओढणी व फुल्लं ड्रेस असावा तसेच मजबूत दर्जेदार बूट व सॉक्स खरेदी करा. एकही शाळा व विद्यार्थी या लाभापासून वंचित राहिला तर यासाठी गटशिक्षणाधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल. अशा सूचना देण्यात आल्या. तसेच विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी निपुण महाराष्ट्र उपक्रमांतर्गत ''मिशन जरेवाडी गुणवत्ता अभियान'' अंमलबजावणी, विद्यार्थी सुरक्षिततेसाठी शाळांमध्ये सी. सी. टी. व्ही. कॅमेरे बसवणे, बालविवाह निर्मुलन करण्यासाठी सर्व शाळा व कार्यालयांच्या दर्शनीय भागावर चाईल्ड हेल्पलाईन नंबर १०९८ पेंट करुन जनजागृती करणे, विद्यार्थ्यांना दर्जेदार शालेय पोषण आहार देणे, शालेय परिसरात वृक्षारोपण करणे, ''एक पेड माँ के नाम'' वृक्षारोपण करताना फळझाडांची लागवड करावी ही आवर्जून सांगा त्यामध्ये परसबाग पूर्ण होईल, यासाठी प्रयत्न करा. कढीपत्त्याचे झाड लिंबोणीची झाडे, शेवगा झाडे जास्तीत जास्त लावावीत. या बाबत तालुका निहाय आढावा घेण्यात आला, तसेच प्रत्येक जिल्हा परिषद शाळेत नवीन विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करुन शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्याबाबतच्या सूचनाही शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद, बीड यांनी दिल्या. पहिल्याच दिवशी सर्व विद्यार्थी गणवेशात शाळेत उपस्थित राहतील, तसेच दि.१६ जून रोजी जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांना बीड जिल्ह्याचे पालकमंत्री, तसेच मंत्री , खासदार व सर्व आमदार, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच जिल्हा परिषदेतील सर्व विभागाचे वर्ग - १ व २ चे अधिकारी तसेच तालुकास्तरावर सर्व गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, साधनव्यक्ती इ. च्या शाळा भेटीचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच शालेय विद्यार्थ्यांना आणलेले गणवेश, बुट व सॉक्स हे दर्जेदार व चांगल्या प्रतीचे आहेत का ? याबाबत सर्व पालकांनी व शाळा व्यवस्थापन समितीने खात्री करुन घ्यावी. असे आवाहन शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी केले आहे. या बैठकीस उपशिक्षणाधिकारी समग्र भगवान सोनवणे,अधीक्षक रंगनाथ राऊत,शालेय पोषण अधीक्षक तुकाराम पवार, ऋषिकेश शेळके, जिल्हा समनव्ययक राहुल चाटे,सर्वशिक्षा, जिल्हा कार्यालयातील सर्व कर्मचारी विस्तार अधिकारी शिक्षण, सर्व गटशिक्षणाधिकारी, सर्व शाळांचे मुख्याध्यापक व समग्र शिक्षा अभियानातील जिल्हा समन्वयक उपस्थित होते.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार दि. १३ जून २०२५



## कुलस्वामिनी हॉस्टेलमधून तरुणी गायब

बीड । प्रतिनिधी

शिवाजीनगर पोलीस ठाणे बीड येथे गुरन६६/२०२५ कलम १३७ (२) भा.न्या.स. प्रमाणे दाखल झालेल्या गुन्हयातील पिडीत अल्पवयीन मुलगी सोनाली रावसाहेब साळुंके वय १७ वर्षे ५ महिने रा. हनुमान मंदीर जवळ चौसाळा ता.जि.बीड हल्ली मुक्काम कुलस्वामीनी होस्टेल, बीएसएनएल ऑफीस समोर डिपी रोड, बीड दि. ३१/०१/२०२५ रोजी दुपारी ०४.०० वा सुमारास तिचे हॉस्टेलच्या मॅडम यांना परीक्षा आहे असे सांगून कोणाला काहीही न सांगता माझी परिक्षा आहे मला गावाकडे जायचे आहे असे म्हणून निघुण गेली आहे. सदर मलीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

नाव सोनाली रावसाहेब साळुंके, वय १७ वर्षे ०५ महिने, पत्ता रा. हनुमान मंदिर जवळ चौसाळा,ता. जि. बीड, रंग गोरा,उंची ०५ फुट, अंगात काळया रंगाची जिन्स, पांढ-या रंगाचा कुर्ता,पायात सॅन्डल, भाषा मराठी, चेहरा लांबट, अंगाने सडपातळ वर्णनाची आहे.

वरील वर्णनाच्या मुलीची माहिती मिळाल्यास किंवा आढळून आल्यास शिवाजी नगर पोलीस ठाणे बीड यांच्याशी संपर्क साधावा असे शिवाजी नगर पोलीस ठाण्याचे मपोउपनी, एन.जी दामधर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# शिरूर तालुक्याला वादळी वाऱ्यासह पावसाचा मोठा तडाखा

## पत्रे उडाली, झाडे मोडली; विद्युत वितरणाचा खेळ खंडोबा

**शिरूर । शंकर भालेकर**

बुधवारी सायंकाळी ४:३० वा. च्या सुमारास पूर्वेकडून अचानक आलेल्या विजेच्या कडकडाटासह वादळी वाऱ्याने शिरूर तालुक्यात मोठे थैमान घातले आहे. छतावरील पत्रे उडाली, अनेक झाडे उन्मळून पडली आहेत तर विद्युत वितरणाचा खंडोबा झाला यामुळे अनेक गावांना रात्र अंधारात चाचपडतच काढावी लागली आहे. वादळी वाऱ्यामुळे झालेल्या नुकसानीची माहिती शिरूर तहसील कार्यालयाला मिळतात तहसीलदार सुरेश घोळवे यांनी नुकसानग्रस्त भागांमध्ये तातडीची भेट देऊन पंचनामे केले आहेत.

शिरूर कासार तालुक्यातील पूर्वभागातील मौजे फुलसांगवी, हाजीपुर गाजीपुर, मार्कडवाडी, शिरापूर गात, निमगाव लमानवाडी तांडा, ब्रम्हनाथ येळंब, पाडळी, आनंदगाव,नांदेवाली, खालापुरी तर पश्चिम भागातील पिंपळनेर, गोमळवाडा, कन्होबाचीवाडी रूपपुर,मानूर आदी गावांना बुधवार दि. ११ जून रोजी सायंकाळी ४:३० वाजण्याच्या अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह मेघ गर्जना करत आलेल्या पावसाने तालुक्याला चांगलेच झोडपून काढले आहे या वादळी वाऱ्यामुळे मोठमोठाली झाडे उन्मळून पडली आहेत. तर अनेकांच्या घरावरील पत्रे उडाली आहेत. विद्युत वितरणाच्या जागोजागी तारा तुटून, पोल पडून मोठा अडथळा निर्माण झाला आहे. रस्त्यालगतची मोठमोठाली झाडे मोडून, उन्मळून पडल्यामुळे रस्त्यावर ठिकठिकाणी रहदारीलाही अडथळा निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणची झाडे विद्युत वितरणाच्या तारेवरती पडल्याने काही ठिकाणी तारा तुटल्या तर काही ठिकाणी पोलही पडले यामुळे विद्युत वितरणाचा पुरताच खेळखंडोबा झाला. परिणामी गेल्या २४ तासअनेक गावांमध्ये विद्युत पुरवठा बंद राहिल्याने मोबाईल नेटवर्कही बंद पडले होते. विद्युत पुरवठा खंडित झाल्याने बहुतांश नागरिकांचे मोबाईल गतप्राण झाले. यामुळे गेल्या २४ तासांमध्ये जनतेला मोठा मनस्ताप सहन करावा लागला आहे. अनेकांच्या घरावरील पत्रे उडाल्याने बेघर होण्याची वेळ आली आहे. छतावरील पत्रे उडाल्यामुळे पावसाने घरातील दैनंदिन जीवनातील घर उपयोगी साहित्य साहित्य भिजल्यामुळे अनेकांना मोठे नुकसान सहन करावे लागेल आहे. एकीकडे हा पाऊस नुकसान करणारा ठरला असला तरी या पावसामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मृगनक्षेत्रांमध्ये या पावसाने आता शेतामध्ये पेरणी,लागवडीला वेग आला आहे.






### दोन दिवसात पंचनामे करून मदतीसाठी प्रस्ताव पाठवणार – तहसीलदार घोळवे

शिरूर कासार तालुक्यातील अनेक गावांमध्ये बुधवारी सायंकाळी वादळी वाऱ्यासह पावसाने थैमान घातले. सदरील घटनेची माहिती तहसीलदार सुरेश घोळवे यांना मिळताच घोळवे यांनी तालुक्यातील आनंदगाव, पाडळी, ब्रम्हनाथ येळंब, खालापुरी आदी गावांना गुरुवारी सकाळी भेटी देऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी केली. या वादळी वाऱ्यामुळे काही जीवितहानी झाली नसली तरी अनेकांच्या पत्रे उडाल्यामुळे, भिंती कोसळल्यामुळे मोठे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त नागरिकांच्या नुकसानीचे दोन पंचनामे पूर्ण करून नुकसानग्रस्तांना मदत मिळण्यासाठी तत्काळ शासनाकडे प्रस्ताव दाखल करण्यात येईल अशी माहिती शिरूर कासारचे तहसीलदार सुरेश घोळवे यांनी आमच्या प्रतिनिधींना दिली आहे.

## कुत्र्याची संख्या कमी करण्यासाठी जालन्यात ६० कुत्र्याचं लसीकरण

जालना । प्रतिनिधी

जालन्यामध्ये अज्ञात कुत्र्यांनी शहरात धुमाकूळ घातला होता यामुळे तसेच काही लोकांना चाव घेतल्याने तसेच काही बालकाला चाव घेतल्यामुळे मृत्यू झाला होता त्या अनुषंगाने जालना शहरातील भटक्या कुत्र्यांची संख्या वाढली असल्याने याबाबत उपाययोजनाकरण्याकरिता

जालना शहर महानगरपालिका आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली व समस्त महाजन सामाजिक संस्था, जालना, यांच्या विद्यमाने शहरातील भटक्या कुत्र्यांची पाहणी करून त्यांचे ( लस लसीकरण करण्या बाबत कार्यक्रमाचे उद्घाटन मा. जिल्हाधिकारी यांच्या हस्ते दि. १० जून २०२५ रोजी करण्यात आले. तसेच दि. ११ जून २०२५ रोजी ६० कुत्र्यांचे लसीकरण करण्यात आले.सद्यस्थिति १००० लसींची मागणी जिल्हा परिषद यांचे कडे करण्यात आली आहे.जालना शहरात अंदाजे १०००० मोकाट कुत्रे असण्याची शक्यता आहे. करिता सदर मोहीम निरंतर चालत ठेवून भटक्या कुत्र्यांची संख्या नियंत्रणात ठेवण्याचा जालना शहर महानगरपालिकेचा प्रयत्न सुरू आहे.





## गेवराईत श्री स्वामी समर्थ पादुका पालखीचे जल्लोषात स्वागत

गेवराई । प्रतिनिधी

अक्कलकोट येथील स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या श्री स्वामी समर्थ महाराज पादुका पालखीचे मंगळवार दि.१० जुन रोजी सायंकाळी गेवराईत शहरात आगमन झाले यावेळी स्वामी भक्तांच्या वतीने वाणी मंगल कार्यालयात पालखीचे जल्लोषात स्वागत करुन अवधूतचिंतन श्री गुरुदेव दत्त, सद्गुरू श्री स्वामी समर्थ की जय असा जयघोष करण्यात आला. यावेळी श्रींची महाआरती व तदनंतर भाविकांनी श्री स्वामी समर्थ पादुका पालखीचे दर्शन घेवून महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी महिला व पुरुष भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट द्वारा आयोजित श्री स्वामी समर्थ महाराज अक्कलकोट पालखीचे गेवराई शहरात मंगळवार दि.१० जून २०२५ रोजी सायं ०५:३० वाजता आगमन झाले. स्वामी भक्तांनी पालखीचे जल्लोषात स्वागत करून श्रींची महाआरती व तदनंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. बुधवारी पहाटे भाविकांच्या हस्ते अभिषेकानंतर पालखीचे पाथर्डीकडे प्रस्थान झाले. सेवेला संदीप राजगुरु , राजेंद्र सिकची, अविनाश कुलकर्णी, , संदीप सिकची, सुधीर जोशी, अनंता वडघणे, श्रीपाद रामदासी, गोपाल लखोटिया व श्री स्वामी समर्थ भक्तगण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पाटोदा (म.) येथे खरीप नियोजन व ऊस विकास शेतीशाळा संपन्न

अंबाजोगाई । प्रतिनिधी

कृषी विभाग, नॅचरल शुगर रांजनी यांच्या संयुक्त विद्यमाने पाटोदा येथे शेतकऱ्यांची शेतीशाळा आयोजित करून खरीप हंगाम व ऊस पिकाचे सद्यस्थितीत करावयाचे व्यवस्थापन अनुषंगाने मार्गदर्शन करण्यात आले. कृषी सहाय्यक ज्ञानेश्वर कदम यांनी सोयाबीन पिकाचे विविध वाण, बियाणे उगवण क्षमता बाबत मार्गदर्शन केले. ऊस विकास अधिकारी शिवप्रसाद येळकर यांनी हुमणी अळीचा जीवनक्रम समजावून सांगून या अळीमुळे होणारे नुकसान बाबत माहिती दिली तसेच सद्यस्थितीत पाऊस पडल्यामुळे कडुलिंबाच्या झाडांवर हुमणी अळीचे प्रौढ निदर्शनास येत असल्याने हुमणी अळी प्रतिबंधात्मक व्यवस्थापनासाठी प्रकाश सापळे, एरंड सापळे, कामगंध सापळे लावणे तसेच सोयाबीन पिकामधील पिवळा मोझॅक विषाणू आणि सूक्ष्म अन्नद्रव्य कमतरतेमुळे निर्माण होणारा पिवळसरपणा यामधील फरक आणि याचे व्यवस्थापन तसेच ऊस पिकामधील चाबुक काणी, गवताळ वाढ रोग आणि पोक्का बोईंग रोग, कांडी कीड, लोकरी मावा, पिठ्या ढेकूण व्यवस्थापन संदर्भात विस्तृतपणे मार्गदर्शन केले त्याचप्रमाणे बेड तयार करून टोकन पद्धतीने सोयाबीन लागवड करणे आणि शून्य मशागत तंत्रज्ञानाचा अवलंब करणे संदर्भात माहिती दिली. बेस्ट ॲग्रो कंपनीचे प्रतिनिधी सुंदर उबाळे यांनी सोयाबीन बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक करून दाखवले. यावेळी कृषी पर्यवेक्षक वैभव भिसे तसेच अविनाश उगले, विजयकुमार देशमुख, राम पन्हाळे, महारुद्र हौसेकर, किसन उगले, धनराज पन्हाळे, दशरथ उगले, संतोष लोहिया व गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**असे करा ऊसातील पोक्का बोईंग, चाबुक काणी, गवताळ वाढ, कांडी कीड व्यवस्थापन**

* चाबुक काणी प्रादुर्भावग्रस्त उसाचे फुटवे विळ्याने कापून घेऊन त्याची काजळी शेतामध्ये पडू न देता व्यवस्थित प्लास्टिकच्या पोत्यात भरून शेता बाहेर नेऊन जाळून टाकावेत त्यानंतर जमिनीखाली राहिलेले उसाचे बेट इतर अवशेष काढून नष्ट करावेत यामुळे रोगाचा प्रसार कमी होण्यास मदत होईल.

* उसावर पोक्का बोईंग व शेंडा कूज रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यावर व्यवस्थापनासाठी १ ग्रॅम कार्बेन्डाझिम प्रति १ लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी.

* काही ठिकाणी चुनखडी युक्त पांढऱ्या जमिनीवर सूक्ष्म अन्नद्रव्य कमतरतेमुळे ऊस पिकाची पाने पिवळी पडत असल्याचे निदर्शनास येत आहे ही सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता म्हणजेच क्लोरोसिस (हरितरोग) ही विकृती असून याच्या व्यवस्थापनासाठी १३:४०:१३ हे फॉलियर ग्रेड विद्राव्य खत ५ ग्रॅम अधिक मॅग्नेशियम सल्फेट दोन ग्रॅम अधिक महाराष्ट्र ग्रेड दोन सूक्ष्म अन्नद्रव्य दोन ग्रॅम प्रति एक लिटर पाण्यातून फवारणी करावी.

* गवताळ वाढीची बेटे आढळल्यास ती मुळासकट काढून जाळून नष्ट करावीत.

* फुले २६५ ऊस जातीच्या संकरातून तयार झालेल्या ऊस जातीमध्ये तांबेरा, पानांवरील तपकिरी ठिपके या बुरशीजन्य रोगांच्या व्यवस्थापनासाठी ३ ग्रॅम मॅन्कोझेब प्रतिलिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी.

* ऊस पिकातील कांडी कीड व्यवस्थापनासाठी क्लोरअँट्रानिलीप्रोल (०.४ टक्का) हे दाणेदार कीटकनाशक हेक्टरी १८.७५ किलो याप्रमाणे पावसाळी खतासोबत पेरून द्यावे.

शिवप्रसाद येळकर, ऊस विकास अधिकारी, नॅचरल शुगर रांजणी.

## चिंचवणमध्ये आझाद क्रांती सेनेच्या शाखेचे उद्घाटन

### राज्यामध्ये आझाद क्रांती सेना आक्रमक होणार –राजेश घोडे

वडवणी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यामध्ये आझाद क्रांती सेनेच्या माध्यमातून प्रत्येक तालुक्यात व जिल्ह्यामध्ये आंबेडकरी चळवळीचं वादळ घोंगावत आहे. महाराष्ट्रातील घराघरात आझाद क्रांती सेनेचा सैनिक तयार करणार व त्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या पाठीशी खंबीरपणे ताकत उभा करायचं काम आझाद क्रांतीसेना करणार असल्याचे प्रतिपादन चिंचवणच्या शाखा उद्घाटन प्रसंगी राजेश घोडे बोलत होते. यावेळी उपस्थित महादेव आवाड ता प्रमुख वडवणी,विलास कारके माजलगाव विधानसभा अध्यक्ष, अरुण आव्हाड जेष्ठ मार्गदर्शक, लक्ष्मण आव्हाड ऊसतोड कामगार संघटना तालुका प्रमुख, मंगेश भाऊ शिंदे ता सचीव, पिंटू आडागळे ता उपप्रमुख ऊसतोड कामगार संघटना, केरबा कसबे,दत्ता गायकवाड,सुरेश लोंढे,बाळु आव्हाड,प्रकाश मुजमुले,रतन मुजमुले,अभिषेक हातागळे,बबलु लोंढे,करण भिसे, महादेव साळवे, यांच्यासह जिल्हाभरातून कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती. पुढे बोलतांना राजेश घोडे म्हणाले की, माझ्या आझाद क्रांती सेनेचा प्रत्येक सैनिक स्वतःच्या पायावर कसा उभा राहील याबाबत आराखडा तयार करणार असून राज्य सरकारच्या माध्यमातून महाराष्ट्रातील विविध योजना आझाद क्रांती सेनेच्या कार्यकर्त्यांपर्यंत व सर्वसामान्य माणसापर्यंत पोहोचल्या पाहिजेत. एवढेच नव्हे तर सर्वसामान्य शेतकरी असेल, कष्टकरी असेल, कामगार असेल, दुकानदार असेल, सर्वसामान्य माणूस असेल जोपर्यंत सर्वसामान्य माणसाला न्याय मिळत नाही तोपर्यंत आझाद क्रांती सेना स्वस्त बसणार नाही असेही यावेळी सेनाप्रमुख राजेश घोडे म्हणाले. उत्तर प्रदेशच्या धर्तीवर जसं खासदार चंद्रशेखर आझाद यांनी आंबेडकरी चळवळ उभा केली त्याच धर्तीवर महाराष्ट्रामध्ये राजेश घोडे यांनी आझाद क्रांती सेनेच्या माध्यमातून कोटी चळवळ उभी केलेली दिसून येत आहे गावागावात तालुक्यात तालुक्यामध्ये व जिल्हा जिल्ह्यामध्ये संपूर्ण महाराष्ट्रात आझाद क्रांती सेनेचे सैनिक काम करणार असून येणाऱ्या काळामध्ये सर्वसामान्य समाजाला न्याय मिळाला पाहिजे या महाराष्ट्रातील दलित समाजावरील अन्याय बंद झाला पाहिजे आणि तो मी मुळातून नष्ट करणारच असा विडा आझाद क्रांती सेनेचे सेना प्रमुख राजेश घोडे यांनी उचलला असून ते चिंचवण मध्ये पत्रकारांशी बोलत होते.



पान ६ वरून...

### आधिस्वीकृती धारक पत्रकारांच्या

स्लीपर बसलाही सवलत लागू होत नाही. महोदय महाराष्ट्रातील २५% पत्रकारही बस ने प्रवास करीत नाहीत. जे करतात त्यांची अर्थिक अडचण असते अशा पत्रकारांचा सन्मान व्हावा अशी आमची अपेक्षा आहे. एस टी महामंडळाच्या सर्वच गाड्यांना आधिस्वीकृतीधारक पत्रकारांसाठी सुविधा उपलब्ध करून द्यावी अशी आमची विनंती आहे. शिवाई इलेक्ट्रिक गाड्यांना ज्येष्ठ नागरिक, महिला, अपंग यासारख्या सवलती उपलब्ध आहेत. मात्र फक्त पत्रकारांसाठीच या गाड्यांमध्ये मोफत प्रवासाची सवलत नाही. आपण आपल्या स्तरावर संबंधितांना सूचना देऊन महाराष्ट्रातील आधिस्वीकृती धारक पत्रकारांना या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे .या निवेदनावर विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे, बीड जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे ,हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरत , जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, संपादक राजेंद्र होळकर, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संजय हांगे, तालुका निमंत्रक मंगेश निटुरकर, समन्वयक लक्ष्मण नरनाळे, तालुका सरचिटणीस प्रचंड सोळंके आदींच्या सह्या आहेत.

### बच्चु कडू यांच्या

राज्यभरातून पाठिंबा मिळत आहे.याचाच एक भाग म्हणून शेतकरी संघर्ष समितीनेही कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला पाठिंबा देत दि १५ जुन रविवार रोजी माजलगाव तालुक्यातील आनंदगाव येथे रॅली काढून गावात दोन तास निदर्शने करण्यात येणार आहेत. तसेच दि १६ जुन सोमवार रोजी माजलगाव येथे आंदोलन करुन उपजिल्हाधिकाऱ्यांची गाडी अडविणार असल्याचा इशारा भाई गंगाभिषण थावरे यांनी दिला आहे.

पान ६ वरून...

### अंबाजोगाई न.प.च्या ढिसाळ

महिन्यांपासून पगार मिळालेला नाही, ही बाब अत्यंत गंभीर असून, त्यांच्या मानधनासाठी प्रशासनाने त्वरीत निर्णय घ्यावा, अशी ठाम भूमिका या मागण्यांमध्ये समाविष्ट होती.

राजकिशोर मोदी यांच्या नेतृत्वात सादर करण्यात आलेल्या या मागण्यांमुळे प्रशासनासमोर अनेक अनुत्तरित प्रश्न उभे राहिले असून, मागण्यांची पूर्तता लवकरात लवकर न झाल्यास जनआंदोलन छेडले जाईल असा स्पष्ट इशारा यावेळी देण्यात आला. हे निवेदन देतांना मनोज लखेरा, महादेव आदमाणे, अमोल लोमटे, दिनेश भराडीया, सुनील वाघाळकर , धम्मा सरवदे, सय्येद रशिद, अशोक गंडले,शाकेर काझी, अंकुश हेडे, सचिन जाधव, जावेद गवळी, सय्येद ताहेर, दत्ता सरवदे, खलील जाफरी,महेबूब गवळी, आकाश कऱ्हाड, अजीम जरगर, यांच्यासह कंत्राटी कामगार मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

### श्री.क्षेत्र गहिनीनाथ गड

रामदास बडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे, माजी सभापती अनिल जायभाये,डिंगाबर नाईकनवरे तसेच इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.घोड्यांचे स्वागत व अर्पण विधी गड संस्थानाच्या अध्यात्मिक सेवेसाठी एक ऐतिहासिक घटना ठरली असून, गड परिसरात भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळाले. भाविकांनी या सोहळ्याचे कौतुक करत माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या योगदानाची विशेष दखल घेतली.

### रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी

लोमटे,सुरेश मोदी,प्रवीण चौकडा, अंगद कराड, डॉ सचिन पोतदार,गणेश राऊत, शकील शेख, डॉ अरुणा केंद्रे, डॉ अतुल शिंदे, गोरख मुंडे,बाळासाहेब कदम, गोपाळ पारीख,अमृत महाजन, अजित देशमुख,अनिल लोमटे,रुपेश रामावत, कल्पना बेलोकर, ओमकेश दहिफळे, प्रदीप झरकर, यांची निवड करण्यात आली आहे. रोटरी क्लबच्या माध्यमातून आगामी काळात सामाजिक व लोकोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. वंचितांसाठी, दिव्यांगासाठी व महिला सक्षमीकरणासाठी विविध योजना राबविण्यात येणार असल्याची रोटरीच्या अध्यक्ष प्रा.रोहिणी पाठक व सचिव मंजुषा जोशी यांनी सांगितले. रोटरी क्लबच्या या नुतन पदाधिकार्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### जिल्हा माहिती अधिकाऱ्यामार्फत

अनेक साप्ताहिकाच्या प्रेस लाईन वर मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक म्हणून एकाच व्यक्तीचे नाव असते मुद्रक अथवा प्रकाशक म्हणून नाव आहे म्हणजे तो पत्रकार अन्य व्यवसाय करतो असे नाही. ते फक्त सोयीसाठी असते. त्यामुळे प्रकाशक आणि मुद्रक म्हणून नाव असणाऱ्यांचा तो अन्य व्यवसाय आहे असे समजू नये त्यालाही लाभ मिळावा. उत्पन्नाची अट दोन लाखावरून वाढवून ती पाच लाख करावी. सन्मान योजनेचा लाभ घेणाऱ्या एखाद्या पत्रकाराचे निधन झाले तर त्याच्या पत्नीला ती हयात असेपर्यंत या योजनेचा लाभ मिळावा. पत्रकार महिला असेल तर तिच्या पश्चात तिच्या पतीला हा लाभ मिळावा. अशा सूचना करण्यात आल्या.

याशिवाय शंकराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीबाबत काही सुधारणासाठी सूचना करण्यात आल्या आहेत. शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण मुदत ठेवीतून मिळणाऱ्या व्याजातून ही योजना चालविण्यापेक्षा या योजनेसाठी अर्थसंकल्पात तरतूद केली जावी. त्यामुळे पत्रकारांसाठीच्या योजनांना निधीची कमतरता भासणार नाही .शंकराव चव्हाण निधीचे जे विश्वस्त मंडळ आहे त्यांच्या बैठका नियमित होत नाहीत दर दोन महिन्यांनी या ट्रस्टच्या बैठका झाल्या तर पत्रकारांचे अर्ज प्रलंबित राहणार नाहीत. आरोग्य योजनेचा लाभ देताना ठराविक आजाराची मर्यादा रद्द करून ही योजना सर्व प्रकारच्या आजारासाठी लागू करावी. अनेकदा असे आढळून आले आहे की बऱ्याच पत्रकारांचे मेडिक्लेम असतात अशा पत्रकारांना त्याची सर्व ओरिजनल कागदपत्रे विमा कंपन्यांना द्यावी लागतात. परिणामतः अशा पत्रकारांना योजनेचा लाभ मिळत नाही .अशा पत्रकारांची हॉस्पिटलची झेरॉक्स कागदपत्रे ग्राह्य धरली जावीत आणि महत्त्वाचे म्हणजे या योजनेसाठी असलेली आधिस्वीकृती पत्रिकेची आठ रद्द केली पाहिजे. राज्यात केवळ आठ टक्के पत्रकारांकडेच आधिस्वीकृती असल्याने ९२ टक्के पत्रकार या अटीमुळे योजनेच्या लाभांपासून वंचित राहतात. पत्रकारांच्या मृत्यूनंतर किमान पाच लाख रुपयांची मदत संबंधित पत्रकाराच्या पत्नीला किंवा मुलांना मिळाली पाहिजे. ही रक्कम मृत्यूनंतर एक महिन्याच्या आत तातडीने दिली जावी त्यासाठी देखील आधिस्वीकृती पत्रिकेची अट नसली पाहिजे आमची सरकारला विनंती आहे की या सूचनांचा गांभीर्याने विचार करावा अशी मागणी ही या निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनावर राज्य कार्यकारिणी सदस्य विलास डोळसे, विभागीय संघटक सुभाष चौरे ,विभागीय सचिव रवी उबाळे, बीड जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, जिल्हा सरचिटणीस सुभाष सुतार, जिल्हा कोषाध्यक्ष धनंजय अरबुणे, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संजय हंगे, जिल्हा निमंत्रक दत्ता आंबेकर , जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरत , तालुका सरचिटणीस प्रचंड सोळंके आदिंच्या सह्या आहेत.

### भाकपचे बीड

कार्यक्रम ठरवण्यात आले. यावेळी ३५ सभासदांची नवीन जिल्हा कौन्सिल निवडण्यात आली. या अधिवेशनासाठी बीड जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यातून अनेक प्रतिनिधी पक्ष सभासदांनी उपस्थिती लावली या वेळी कॉ. महादेव नागरगोजे, कॉ. नवनाथ रांजवण, कॉ. रंजना हरकुडे, कॉ. ज्योतिराम हरकुडे, कॉ. उत्तमराव सानप, डी जी तांदळे कॉ.उस्मान पठाण, ॲड भीमराव चव्हाण, पंकज चव्हाण, ॲड अंबादास आगे, कॉ. करुणा टाकसाळ, फिडेल चव्हाण, योगेश वाघमारे, जानवी हुरकुडे, सह अनेकांची उपस्थिती होती. जिल्हा सचिव म्हणून कॉम्रेड भाऊराव प्रभाळे यांची फेरनिवड करण्यात आली. सर्वांनी त्यांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या.

### पोलिस व्हॅन व खासगी

गाडीत द्यावे लागले? ती पोलिस व्हॅन कुठली होती? याची चौकशी बीड पोलिस अधिक्षक करतील का? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक विचारत आहे. या अगोदरही गोव्याची दारू पोलिसच्या व्हॅनमध्ये दारू बॉक्स, गुटखा बॅग बीडमध्ये पोहच केल्या जातात या गोष्टी एवढ्या गोपनीय केल्या जातात की पोलीस व्हॅन म्हटल्यानंतर कोणी जास्त लक्ष देत नाही. तसेच कोणी हटकल्यानंतर त्याला पॉलिसी खाक्या दाखवल्या जातात त्यामुळे या अगोदर कुणी तक्रार घेऊन पुढे आले नाही. पाथर्डी मार्गे औरंगाबादला जाणारे कपिल सरोदे यांनी घडलेला प्रकार त्यांच्या मोबाईलमधे कैद केला व सोशल मीडियावर टाकला आहे आता बीड पोलिस अधिक्षक नवनीत सर यांनी प्रकरणाची सखोल चौकशी करून कारवाई करत खुलासा करतील का? हा प्रश्न निर्माण झाला आहे.

### शासनाने निर्धारित केलेल्या

जास्त असल्याने त्याचा विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर आणि स्वास्थ्यावर विपरीत परिणाम करणाऱ्या आहेत. त्यामुळे शाळांच्या वेळाची सांगड घालणे गरजेचे आहे. जेणेकरून शिक्षण हे विद्यार्थ्यांसाठी आनंददायी व्हावे यासाठी शिक्षण विभागाने प्रयत्न केला पाहिजे असे मनोज जाधव यांनी म्हटले आहे. शाळा व्यवस्थापन आपल्या मनमानी पद्धतीने नियमावली तयार करून ती विद्यार्थी आणि पालकांवर लादत आहेत. शासनाच्या नियमावलीचे त्यांना कसलेही देणे घेणे नसते. शाळांच्या भरण्याची वेळ ९ वाजता असताना देखील ९ पूर्वीच शाळा भरवणे, सहा ते सात तासा पर्यंत शाळा सुरू ठेवणे अशा असंख्य गोष्टी शाळा आपल्या मनमानी पद्धतीने करत आहेत. मात्र याला आळा घालण्यासाठी शिक्षण विभाग अकार्यक्षम असल्याचे दिसून येते. विद्यार्थी आणि पालकांना आपल्या तालावर नाचवले जाते आणि त्यांचा मानसिक छळ केला जातो हा खेळ नसून शैक्षणिक व्यवस्था आहे. असे पालक वर्गातून बोलले जात आहे.

cmyk

# मधाच्या १० गावांसाठी निधी मंजूर

## पहिल्या टप्प्यात ५ कोटी १ लाख ९७ हजार रुपयांचे होणार वितरण

मुंबई : राज्य सरकारने प्रत्येक जिल्ह्यात एक मधाचे गाव करण्यासाठी १७ कोटींचा निधी मंजूर केला आहे. पहिल्या टप्प्यात ५ कोटी १ लाख ९७ हजार रुपयांचा निधीला मान्यता देण्यात आली आहे. या योजनेसाठी पहिल्या टप्प्यात राज्यातील दहा जिल्ह्यातील दहा गावांची निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील विविध गावांमध्ये मधमाशीपालन आणि मधनिर्मिती उद्योगाला चालना देण्यासाठी योजना राबवली जात आहे. २०२३ मध्ये उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पात प्रत्येक जिल्ह्यात एक मधाचे गाव करण्याची घोषणा केली. त्यातून ग्रामीण भागात पर्यटनासाठी चालना मिळेल, असा विश्वासही फडणवीस यांनी व्यक्त केला. दरम्यान लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या काळात योजनेचं काम रखडलं होतं. परंतु राज्य सरकारने आता मात्र योजनेच्या निधीला मंजूरी दिली आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाने योजनेच्या पहिला टप्पास सुरूवात केली आहे. मध उद्योग निर्मितीसाठी १० गावांची निवड करण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सभापती रवींद्र साठे यांनी ॲग्रोवनला दिली आहे.



''मधाचे गाव हा उपक्रम म्हणजे महाराष्ट्रात मधक्रांती होण्याकडे वाटचाल आहे. यामुळे मधमाशीपालन उद्योगास प्रतिष्ठा प्राप्त होईल. ग्रामीण विकासास चालना मिळेल. पहिल्या टप्प्यामध्ये ५ कोटी १ लाख ९७ हजार रुपयांचा निधी मंजूर आहे. मधाच्या गावांसाठी निकष आणि अटीनुसार निवड करून पारंपारिक मधमाशीपालकांना या प्रकल्पांतर्गत ९० टक्के अनुदान देण्यात येणार आहे. तर १० टक्के खर्च मधमाशीपालकांनी करणं अपेक्षित आहे.'' असंही साठे यांनी सांगितलं.

मधाचे गाव निवडल्यानंतर गावामध्ये एक समिती स्थापन करण्यात येणार आहे. तसेच प्रस्तावित गावांकडे योजना पुढील वर्षभर सुरू ठेवण्याची जबाबदारी निश्चित करण्यात येणार आहे. त्यासाठी ग्रामपंचायतीकडून हमीपत्र घेण्यात येणार आहे. मधाचे गाव योजना राबवण्यासाठी खादी व ग्रामोद्योग मंडळाकडे जबाबदारी सोपवण्यात आली आहे. निवडलेल्या गावांमध्ये मधमाशी पेट्या देऊन मधाची खरेदी मंडळाकडून करण्यात येणार आहे. तर या गावांमध्ये मध माहिती केंद्र, मधसंकलन केंद्र देखील उभारण्यात येणार आहेत. दरम्यान, मधाचे गाव योजनेत यापूर्वी महाबळेश्वर तालुक्यातील मांघर आणि भुदरगड तालुक्यातील पाटगावची निवड करण्यात आली. या गावांमध्ये एक ते दीड लाख पर्यटकांनी भेटी दिल्या आहेत. आता नव्याने या योजनेत १० गावांचा त्यामध्ये समावेश करण्यात आला आहे.

### या गावांना मिळणार निधी

घोलवड, जि. पालघर - ५४ लाख. भंडारवाडी, जि. नांदेड - ५३ लाख. बोरझर, जि. नंदुरबार- ४८ लाख. काकडदाभा, जि.हिंगोली- ४९ लाख. चाकोरे, जि. नाशिक- ४०.२२ लाख. उडदावणे, जि. अहिल्यानगर- ४६.७५ लाख. शेलमोहा, जि. परभणी- ५४ लाख. सिंधीविहिर, जि. वर्धा- ५४ लाख. सालोशी, जि. सातारा - ४९ लाख. आमझरी, जि. अमरावती- ५४ लाख.

# आधुनिक शेतीसाठी मोठे गुंतवणूक धोरण-मुख्यमंत्री फडणवीस



शेती क्षेत्रात आधुनिकतेकडे वाटचाल करताना राज्य शासन एआय, सौरऊर्जा आणि सिंचन सुविधा यांसारख्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करीत आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्याबरोबरच त्यांचा खर्चही कमी होईल,'' असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

अकोला येथे बुधवारी सुमारे २७०० कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण पार पडले. यानंतर आयोजित भाजप कार्यकर्त्यांच्या संवाद सभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे बोलत होते. या वेळी सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले, पालकमंत्री आकाश फुंडकर, भाजपचे कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, खासदार अनुप धोत्रे व इतर लोकप्रतिनिधी उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांनी या वेळी काटीपाटी बॅरेज, पशुसंवर्धन महाविद्यालय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, विविध रस्ते, सौरऊर्जा प्रकल्प यांसह अन्य प्रकल्पांचे लोकार्पण केले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले, की विदर्भातील सिंचन प्रकल्प पूर्णत्वास नेण्यात आले असून, २०२७ पर्यंत विदर्भाचा अनुशेष संपवण्याचा निर्धार शासनाने केला आहे. वैनगंगा-नळगंगा प्रकल्पाद्वारे भंडाऱ्यातून बुलडाणा-वाशीमपर्यंत पाणी नेण्यात येणार आहे. यामुळे १० लाख हेक्टर शेती सिंचनाखाली येईल. पोकरा प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याची यशस्वीपणे अंमलबजावणी झाल्याने जागतिक बँकेने कौतुक करीत दुसऱ्या टप्प्यासाठी ५ हजार कोटी रुपये दिल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

### शेतीसाठी सौर ऊर्जेचा आधार

डिसेंबर २०२६ पर्यंत १६ हजार मेगावॅट सौर ऊर्जा निर्माण करून शेतकऱ्यांना दिवसा १२ तास मोफत वीज देण्याचे उद्दिष्ट असल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली. विकासाची गाडी आता सुसाट वेगाने धावत आहे. शेवटच्या माणसापर्यंत सेवा पोहोचवण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. पारदर्शक व उत्तरदायी प्रशासन हेच आमचे धोरण आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

# अती युरिया खाण्यापासून जनावरांना वाचवा

आधुनिक तंत्रज्ञान आणि संशोधनामुळे शेती आणि पशुपालनात विविध सुधारणा झाल्या आहेत. यामध्ये एक महत्त्वाचा घटक म्हणजे युरियाचा वापर. युरिया सामान्यतः खत म्हणून वापरला जात असला, तरी पशुखाद्यातही त्याचा वापर केला जातो, विशेषतः निकृष्ट चारा सकस करण्यासाठी. पण युरियाचा अति किंवा चुकीचा वापर जनावरांसाठी अत्यंत घातक ठरतो. युरियामुळे जनावरांमध्ये तीव्र विषबाधा होऊ शकते आणि वेळेवर उपचार न केल्यास जीवसुद्धा गमवावा लागू शकतो.

युरिया खाल्ल्यावर जनावरांच्या पोटात असलेल्या 'कोठी' भागात (रवंथ करणाऱ्या जनावरांमध्ये) युरिया अमोनियामध्ये रूपांतरित होतो. या अमोनियाचे योग्य प्रमाणात रूपांतर अमायनो ॲसिडमध्ये होते आणि ते जनावराच्या प्रथिनाच्या गरजा पूर्ण करते. पण जर युरियाचे प्रमाण जास्त झाले, तर अमोनियाचे प्रमाण शरीरात विषारी पातळीवर जाते, ज्यामुळे जनावरांना विषबाधा होते. युरियाची विषबाधा कशी होते याची अनेक कारणे असतात उघड्या ठिकाणी ठेवलेली युरियाची पोती जनावरांनी चाटल्याने, चुकून जनावरांनी युरियायुक्त चारा खाल्ल्याने किंवा अति प्रमाणात युरिया वापरल्यामुळे. विषबाधेची लक्षणे झपाट्याने दिसून येतात. जनावरांच्या तोंडाला फेस येतो, लाळ गळते, दात खाणे, पोटात तीव्र वेदना, पोट फुगणे, उभं राहता न येणे, उठबस करणे, लघवी थोड्या थोड्या प्रमाणात होणे, श्वासाचा वेग वाढणे आणि शेवटी अतिताणामुळे मृत्यू होतो. उपचार करताना वेळ अत्यंत महत्त्वाचा असतो. सुरुवातीला लगेच व्हिनेगार म्हणजेच ॲसिटिक ॲसिड ३-४ लिटर प्रमाणात हळूहळू जनावराला पाजावे. यामुळे कोठी पोटात अमोनियाची रासायनिक क्रिया थांबते आणि विषबाधा कमी होते. काही वेळाने लक्षणे कमी न झाल्यास प्रत्येक अर्ध्या तासाने हे आम्ल पुन्हा दिले जाऊ शकते. त्याचबरोबर जनावराच्या पोटात थंड पाणी टाकल्याने देखील अमोनियाचे प्रमाण कमी करता येते. या उपचारांसोबत पशुवैद्यकीय सल्ल्याने इतर पूरक औषधे द्यावीत. पशुपालकांनी काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. युरियाची पोती उघड्या ठिकाणी ठेवू नयेत, जनावरांना पाण्याविना उपाशी ठेवू नये आणि युरियाचा वापर करताना त्याचे प्रमाण काटेकोरपणे पाळावे. सामान्यतः एका ४०० किलो वजनाच्या गाईसाठी दररोज ३५-४० ग्रॅम युरिया यापेक्षा अधिक देणे धोकादायक ठरू शकते.





# सुक्ष्म जिवाणुच्या माध्यमातून सांभाळा जमीनीचा पोत

सूक्ष्म जिवाणूंच्या वाढीस पोषक असणाऱ्या जमिनीच्या पोताचा व सेंद्रिय पदार्थाचा हास यांच्या संबंधाचा विचार केला तर भारी जमिनीपेक्षा हलक्या व जमिनीत ऱ्हास अधिक होतो. याचे कारण म्हणजे हलक्या जमिनीत हवा खेळती राहते व त्यामुळे कुजण्याचा वेग वाढतो. याउलट भारी जमिनीत हवा खेळती राहण्यास प्रतिबंध होतो व कुजण्याचा वेग मंदावतो. याशिवाय भारी जमिनीत सेंद्रिय पदार्थ व त्यांच्या ज्वलनातून निर्माण झालेले उपपदार्थ चिकणमातीच्या कणांवर स्थिर राहिल्याने त्यांचा ऱ्हास कमी होतो.

खेळती हवा : हवा जितकी अधिक खेळती राहील तितका. सेंद्रिय कर्बाचा कुजण्याचा वेग जास्त राहतो. या बाबींचा संबंध जमिनीच्या मशागतीच्या प्रकाराशीही जवळचा आहे. जितकी मशागत जास्त तितकी जमिनीत खोलवर हवा खेळती राहून सेंद्रिय कर्बाचा -हास झपाट्याने होतो. त्यामुळे सेंद्रिय कर्बाचा -हास कमी करण्यासाठी जमिनीच्या मशागतीची पातळी किमान व हलक्या स्वरुपाची ठेवणे अधिक श्रेयस्कर ठरेल. विशेषत: ही बाब हलक्या ते मध्यम जमिनीत अधिक कटाक्षाने लक्षात ठेवली पाहिजे.

जमिनीचे तापमान : जमिनीचे तापमान हा दुसरा घटक आहे. तापमान जितके जादा तेवढा सेंद्रिय पदार्थांचा ऱ्हास अधिक होतो. काही शास्त्रज्ञाने सेंद्रिय पदार्थांच्या कुजण्याचा वेग ठरवणाऱ्या अनेक घटकांचा व त्यांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास करून असा निष्कर्ष काढला आहे की एखाद्या भौगोलिक स्थानाचे सरासरी तापमान १० अंश सेल्सिअसने वाढले तर सेंद्रिय पदार्थ कुजण्याचा वेग कमी करण्यासाठी जमिनीवर सेंद्रिय पदार्थांचे आच्छादन व ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करता येतो. परंतु ही व्यवस्थापन पद्धती सर्व ठिकाणी अधिक असलेल्या जमिनीत सेंद्रिय कर्बाचे प्रमाण अधिक असल्याचे आढळून आले आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे तापमानाचे नियमन तर आहेच परंतु त्याशिवाय तेथे सेंद्रिय पदार्थांची निर्मितीही फार मोठ्या प्रमाणात होत असते.



कर्बाचे गुणोत्तर : सेंद्रिय पदार्थातील कर्बाचे गुणोत्तर जेवढे कमी तेवढा सेंद्रिय पदार्थ कुजण्याचा वेग अधिक आढळून येतो. म्हणूनच द्विदलवर्गीय पिकांचे अवशेष हे एकदल पिकांच्या तुलनेने लवकर कुजतात व पर्यायाने सेंद्रिय पदार्थांचा वेगाने व्हास होतो. म्हणून कर्ब: नत्राचे वेगवेगळे गुणोत्तर असणारे शेतातच उपलब्ध होणारे सेंद्रिय पदार्थ वापरल्यास कर्बाची पातळी बऱ्यापैकी राखण्यास मदत होते.

हिरवळीची पिके : जमिनीत प्रत्येक प्रकारच्या वनस्पतीच्या मुळाभोवती विशिष्ट प्रकारच्या जिवाणूंच्या प्रजाती अधिक प्रमाणात व प्रभावीपणे कार्यरत असतात. म्हणून हिरवळीच्या पिकांमध्ये वेगवेगळ्या पिकांचा समावेश करावा. शेतीमध्ये सेंद्रिय पदार्थांची उपलब्धता वाढविण्यासाठी वेगवेगळ्या उंचीची विविध मोसमात फुलांवर व फळांवर येणारी सदाहरित तसेच पानगळ होणारी यांचे सुयोग्य मिश्रण असणारी वृक्षराजी वनशेती पद्धतीच्या माध्यमातून निवडणे हितावह होईल.

सूक्ष्म जिवाणूंची कार्ये : टाकाऊ सेंद्रिय पदार्थ व त्यांचे अवशेष कुजविणे. हवेतील नत्राचे जमिनीत स्थिरीकरण करणे. वनस्पतीतील अन्नद्रव्यांचे चक्रीकरण करून त्यांची उपलब्धता वाढविणे. संप्रेरकाची निर्मिती करून अविद्राव्य अन्नद्रव्यांचे रुपांतर विद्राव्य स्वरुपात करून त्यांची उपलब्धता वाढविणे. कार्बनयुक्त पॉलीसॅकराइड्स या संयुगांची निर्मिती करून जमिनीतील मातीच्या कणांचे संग्रहीकरण सुधारविणे.

त्यामुळे जमिनीच्या प्राकृतिक गुणधर्मात सुधारणा होणे. जमिनीत मातीत प्रवेश केलेल्या कीटकनाशकासारख्या विषारी द्रव्यांचे विषारीपण कमी करणे. जमिनीत प्रतिजैविके निर्माण करून पिकांना उपद्रवी असलेल्या सूक्ष्मजिवाणूंचा नाश करणे. सेंद्रिय पदार्थाचे विघटन करून साध्या सेंद्रिय संयुगात रुपांतर करणे (ही संयुगे पिकांकडून सहज शोषून घेतली जातात. उदा. ॲमिनो आम्ले). मातीद्वारे रोगनिर्मिती करणाऱ्या जिवाणूंच्या वाढीस प्रतिबंध करणे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६५ : शिवाजीमहाराजांनी राजा जयसिंगची भेट घेऊन त्यांच्याबरोबर सलोख्याची बोलणी करण्यासाठी त्याच्या शिबिरामध्ये प्रवेश केला.
१७७६ : अमेरिका देशाला स्वातंत्र्य घोषित करण्यासाठी घोषणापत्र तयार करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली.
१८६६ : अलाहाबाद उच्च न्यायालयाची स्थापना.
१८९५ : पॅरिस-बॉर्डोक्स-पॅरिस ही इतिहासातील पहिली ऑटोमोबाईल रेस किंवा पहिली मोटर रेस झाली.
१९०१ : न्यूझीलंडने कूक बेटे बळकावली.
१९०७ : नॉर्थनम्प्टनशायर क्रिकेट संघ १२ धावांत सर्वबाद.
१९२१ : ब्राझील देशांतील महिलांना मतदान करण्याचा अधिकार प्राप्त झाला.
१९३५ : एडविन आर्मस्ट्राँगने पहिल्यांदा एफ.एम. लहरींचे प्रसारण केले.
१९३७ : जोसेफ स्टालिनने आपल्याच ८ लष्करी अधिकार्यांना ठार केले.
१९५५ : जगातील पहिल्या मैग्नेशियम जेट विमानाने भरारी घेतली.
१९६४ : पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या इच्छेप्रमाणे त्यांच्या अस्थ्या संपूर्ण देशभर विसर्जित करण्यात आल्या.
१९७० : ॲनामे हेस, एलिझाबेथ पी. हॉइसिंग्टन या अमेरिकन सैन्यातील पहिल्या स्त्री जनरल झाल्या.
१९७२ : दारू पिउन रेल्वे चालवल्यामुळे एल्थाम वेल हॉल येथे रेल्वे अपघात होऊन ६ जण ठार व १२६ जण जखमी झाले.
१९९७ : सुखोई-३०के ही रशियन बनावटीची विमाने भारतीय हवाई दलात दाखल.
१९९८ : कॉम्पॅक कॉम्पुटर कंपनी ने डिजिटल एक्विपमेंट कॉर्पोरेशन विकत घेण्यासाठी ९ अब्ज अमेरिकी डॉलर मध्ये इतिहासातील सर्वात मोठा सौदा केला.
१९८७ : १६० वर्षाच्या कालखंडात ब्रिटीश देशाच्या पंतप्रधान पदावर सलग तिसऱ्यांदा विराजमान होणाऱ्या पंतप्रधान मार्गारेट थॅचर या पहिल्या ब्रिटीश नागरिक ठरल्या.
२००४ : कॅसिनी-हायगेन्स अंतराळयान शनिचा उपग्रह फीबी जवळून गेले.
२००७ : बांगलादेशातील चितगावमध्ये भूस्खलनामुळे १३० लोक ठार झाले.
२००८ : भ्रष्ट्राचाराच्या आरोपाखाली तुरुंगात कैद असलेल्या बांगलादेशाच्या पूर्व पंतप्रधान शेख हसीन वाजेद यांची सुटका करण्यात आली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१५ : भारतीय-श्रीलंकन छायाचित्रकार जुलिया मार्गारेट कॅमेरॉन यांचा जन्म. (मृत्यू: २६ जानेवारी १८७९)
१८८० : अमेरिकेचे पहिले संसद सदस्य रैफिन यांचा जन्मदिन.
१८९४ : टोयोटा मोटर कंपनीचे संस्थापक काइचिरो टोयोडा यांचा जन्म. (मृत्यू: २७ मार्च १९५२)
१८९७ : क्रांतिकारक रामप्रसाद बिस्मिल यांचा जन्म. (मृत्यू: १९ डिसेंबर १९२७)
१९०९ : भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश व राजकारणी तसचं, निट्टे एज्युकेशन ट्रस्टचे संस्थापक के.एस. हेगडे यांचा जन्मदिन.
१९२४ : साली भारतीय व्यंगचित्रकार, पत्रकार आणि लेखक अत्तूपुरथू मॅथ्यू अब्राहम उर्फ अबू अब्राहम यांचा जन्मदिन.
१९३७ : साली पद्मभूषण व संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय नर्तक, नृत्यदिग्दर्शक आणि शैक्षणिक तसचं, नालंदा नृत्य संशोधन केंद्राच्या संस्थापक-दिग्दर्शिका आणि मुंबईतील नालंदा नृत्य कला महाविद्यालयाच्या संस्थापक-प्राचार्या कनक रेले यांचा जन्मदिन.
१९४२ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय उत्प्रेरक वैज्ञानिक, आणि औद्योगिक संशोधन परिषदेच्या राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे माजी संचालक पॉल रत्नसामी यांचा जन्मदिन.
१९४८ : बिहारचे मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव यांचा जन्म.
१९८२ : टंबलर चे सहसंस्थापक मार्को आर्मेंट यांचा जन्म.
१९८९ : भारतीय पॅरा-बॅडमिंटनपटू मानसी गिरीशचंद्र जोशी यांचा जन्मदिन.
१९९० : साली अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय हॉकी पटू सविता पुनिया यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

३२३ई.पुर्व : मॅसेडोनियाचा राजा अलेक्झांडर द ग्रेट यांचे निधन. (जन्म: २० जुलै ख्रिस्त पूर्व ३५६)
१७२७ : इंग्लंडचा राजा जॉर्ज (पहिला) यांचे निधन. (जन्म: २८ मे १६६०)
१९०३ : सर्बियाचा अलेक्झांडर (पहिला) यांची सर्बियन पत्नी ड्रगा माशिन यांचे निधन. (जन्म: ११ सप्टेंबर १८६४)
१९२४ : इतिहासाचार्य, लेखक, नाटककार व कवी वासुदेव वामन तथा वासुदेवशास्त्री खरे यांचे निधन. (जन्म: ५ ऑगस्ट १८५८)
१९५० : प्रसिद्ध महाराष्ट्रीयन मराठी भाषिक लेखक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि स्वातंत्र्यसेनानी तसचं, भारतीय राष्ट्रीय शिक्षक म्हणून ओळखले लोकप्रिय असणारे पांडुरंग सदाशिव साने उर्फ साने गुरुजी यांचे निधन.
१९८३ : घन:श्याम बिर्ला, भारतीय उद्योगपती. (जन्म: १० एप्रिल १८९४)
१९९७ : भारतीय सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय पुरस्कार पद्मश्री व पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय दूर अंतरीय जलतरणपटू आणि व्यावसायिक तसचं, इंग्लिश खाडी पार करणारे पहिले भारतीय नागरिक मिहीर सेन यांचे निधन. (जन्म: १६ नोव्हेंबर १९३०)
२००० : राजेश पायलट, अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री. (जन्म: १० फेब्रुवारी १९४५)

# कर्जमाफी करिता किसान सभेचे तीव्र निदर्शने

## आ.बच्चू कडू याच्या उपोषणाला किसान सभेचा पाठींबा

बीड । प्रतिनिधी

अस्मानी आणि सुलतानी संकटाचा सामना करत असताना बळीराजा पुन्हा एकदा संकटात सापडला असून या खरीप हंगामाच्या तोंडावर झालेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे अतोनात हाल केले असून खरिपाची पेरणी कशी करावी या विदारक मानसिकतेत बोगस व महागडी खते, बी-बियाणे याचा खर्च कसा करावा या चिंतेने शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होत आहेत या सर्व परिस्थितीत शेतकऱ्यांची कर्जमाफी करत तातडीने बळीराजाला मदत करावी यासाठी बीड जिल्हा किसान सभेने गुरुवार (दि १२ ) रोजी माजलगाव उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करत आ.बच्चु कडू याच्या उपोषणाला पाठींबा देत सरकारचा निषेध केला.

सरकारी धोरणांमुळे शेतकरी कायम अडचणीत आलेला असून तो कर्जबाजारी झालेला आहे. या कर्जाच्या विळख्यातून त्याला बाहेर काढण्याचे आश्वासन राज्य सरकार मध्ये बसलेल्या सत्ताधारी पक्षांनी विधानसभा निवडणूक जाहीरनाम्यात दिले होते. मात्र निवडून येताच 'आम्ही असे बोललोच नाही', 'बोललो असलो तरी आम्ही मुदत दिलेली नाही' अशी सारवासारव सुरू केली आहे. बीड जिल्हा किसान सभेने वेळोवेळी कर्जमाफी, पिकविमा, हमीभाव, गायरानजमीन, शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्यासंबंधी प्रश्न लावून धरला. खरिपाच्या तोंडावर अवकाळी पावसाने केलेले नुकसान, सत्ताधारी मंडळींचे बळीराजा प्रति असलेली आस्था या सर्वच चीड आणणाऱ्या बाबीबर प्रहार संघटनेचे शबच्चू कडू यांनी या व इतर काही मुद्याला घेऊन उपोषण सुरु केले आहे. त्या उपोषणास अखिल भारतीय किसान सभेचा पूर्ण पाठिंबा आहे.राज्य सरकारमधील सत्ताधारी पक्षांनी निवडणूक वेळी दिलेले आपलं वचन पाळून बच्चू कडू यांना उपोषणापासून परावृत्त करावे. असे झाले नाही बीड जिल्हा किसान सभा या प्रश्नांना घेवून आपल्या पूर्ण ताकतीनिशी मोठे आंदोलन छडेल असा इशारा यावेळी किसान सभेने दिला. या निदर्शने प्रसंगी किसान सभेचे कॉ.एड.अजय बुरांडे, कॉ. मुरलीधर नागरगोजे, कॉ. दत्ता डाके, कॉ.कृष्णा सोळंके, कॉ.सुदाम शिंदे, कॉ. सुदामदादा देशमुख, कॉ. सुहास झोडगे, कॉ.शिवाजी कुरे, कॉ.सुभाष डाके, कॉ.अशोक डाके, कॉ.अशोक राठोड, कॉ.बंडू गरड, कॉ.चंद्रकांत घाटे, कॉ.फारुख शेख आदींसह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# माऊली भक्तांच्या सेवेसाठी खा.सोनवणे सरसावले

### चाकरवाडीत अखंड हरीनाम सप्ताह, खा.सोनवणेंनी प्रशासनाला दिले होते पत्र

बीड। प्रतिनिधी

श्री.क्षेत्र चाकरवाडी येथे भव्य अखंड हरीनाम सप्ताह सुरू असून याठिकाणी दररोज ३ ते ५ लाख भाविक येत असतात. त्यांची आरोग्य तपासणी व्हावी आणि त्याठिकाणी उपचार मिळावेत, यासाठी आरोग्य शिबीर घ्यावे, असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी आरोग्य विभागाला दिले होते. त्यानूसार आज चाकरवाडी येथे आरोग्य शिबीर आयोजीत करण्यात आले आहे.

चाकरवाडी येथे अखंड हरीनाम सप्ताह सुरू असून याठिकाणी आरोग्य यंत्रणा सज्ज असणे आवश्यक आहे. यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी लक्ष घातले. त्यानूसार मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष आणि एसआरटी मेडीकल कॉलेज अंबाजोगाई, जिल्हा रूग्णालय बीड, प्राथमिक आरोग्य केंद्र येळंबघाट यांच्या संयुक्त विद्यमाने संत श्री ज्ञानेश्वर माऊली यांच्या पंचेवीसाव्या पुण्यस्मरनार्थ मोफत आरोग्य शिबीर शुक्रवार दि.१३ जून रोजी सकाळी दहा ते ३ वाजेपर्यंत आयोजीत केले आहे.

या शिबीरात मल्टी पॅरामॉनीटर रक्तदाब तपासणी, ग्लूकोमिटरवर डायबेटीस तपासणी, ईसीजी तपासणी, ५३ प्रकारच्या रक्त तपासण्या मोफत करण्यात येणार आहेत. रूग्णांनी येताना रेशनकार्ड, आधारकार्ड सोबत आणने आवश्यक आहे. याठिकाणी स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय वैद्यकिय महा व रूग्णालय अंबाजोगाई यांनी १४ वैद्यकिय तज्ञांची टिम दिली असून तसे आदेश अधिष्ठाता यांनी काढले आहेत. तज्ञांमध्ये डॉ़खानेता अंदलीब, डॉ.विवेक गौर, ओंकार जाधव, डॉ.सम्यक भिवगुडे, डॉ.निलेश जायभाय, डॉ.हर्षदा सुर्यवंशी, डॉ.सुजाता डोंगरे, डॉ.प्रियंका घुले, डॉ.सचिन कटले, डॉ.कैलास भागवत, आनंद सिताप, अशोक वाघोले, उत्तम सानप, के.बी.कांबळे हे शिबीरात असणार आहेत.

# मानसिक आरोग्यासाठी ईश्वर भक्तीची गरज-प्रदीप मिश्रा

### चाकरवाडी येथे जोरात पाऊस व जोरदार वारे



चाकरवाडी। प्रतिनिधी

सध्याच्या परिस्थितीत माणूस हा पूर्णपणे खचलेला आहे. गोंधळलेला आहे मुलं ऐकत नाहीत, पत्नी ऐकत नाही, आई-वडिलांच मुले ऐकत नाहीत, सर्वत्र गोंधळाची परिस्थिती असून माणूस हा मानसिक दृष्ट्या गोंधळलेला आहे अशा परिस्थिती मानसिक आरोग्यासाठी ईश्वर भक्तीची गरज असल्याचे प्रतिपादन परमपूज्य दीपक जी मिश्रा यांनी केले.

चाकरवाडी येथील विसाव्या शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या कृपाशीर्वादाने व तपो निधी शांती ब्रह्म गुरुवर्य महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व शिवपुराणकथेत दीपक जी मिश्रा बोलत होते.

ईश्वर भक्ती हीच माणसाला स्थैर्य लाभून देते. त्यामुळे ईश्वरभक्तीतच मोठा आनंद असल्याचे दीपक जी मिश्रा यांनी सांगून पुढे ते म्हणाले की ईश्वर सेवा ही तर महत्त्वाची आहेच त्याशिवाय दिन दलित दुःखी त्यांची सेवा करणे यात सुद्धा ईश्वर भक्तीचा सार आहे. गरिबांच्या सेवेतूनही देव मिळतो शरीराला आजार झाला तर तो नष्ट करण्यासाठी औषधी घेतल्या जातात मात्र मनाला झालेला रोग हा केवळ ईश्वर भक्तीतून दूर होऊ शकतो. त्यामुळे प्रत्येकाने ईश्वरभक्ती करणे गरजेचे आहे ईश्वर भक्ती केल्यानेच मानसिक आजार दूर होऊ शकतात एवढी ताकद ईश्वर भक्ती मध्ये आहे. माणूस कोण आहे आणि कोठे बसलेला आहे यावर त्याचे महत्त्व विशद होते. दारूचा, अड्डा जुगाराचा अड्डा आणि संत संगत या तीन पैकी संत संगतीत माणसाचे महत्त्व नक्कीच अधिक असते. शिवशंकर हे भोळे असून अपार श्रद्धा आणि भक्ती करणाऱ्या भक्ताला ते पावन होतात पैशाने श्रीमंत असून चालत नाही शरीराला झालेला रोग पैशाने आणि औषधाने कमी करता येईल, परंतु मनाला झालेला रोग हा केवळ अध्यात्मात आणि ईश्वर भक्तीतून दूर होऊ शकतो, असे मार्गदर्शन यावेळी दीपक जी मिश्रा यांनी केले.

चाकरवाडी येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व शिवपुराण कथे भजन गात असताना महादेव महाराज चाकरवाडी कर व नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरीकर हे भाविक भक्तासोबतच भजनात तल्लीन झाल्याचे चित्र आज शिवपुराण कथेच्या प्रसंगी दिसून आले. चाकरवाडी येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व शिवपुराणकथेस गुरुवारी आमदार विजयसिंह पंडित माजी आमदार संगीता ठोंबरे जिल्ह्याचे नेते रमेश आडसकर सह संत महंतांनी भेटी देऊन महाप्रसादाचा लाभ घेतला.चाकरवाडी येथील महान संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित करण्यात येत असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहास काशी विश्वनाथ मंदिराचे आचार्य पुजारी गणेश शास्त्री द्रविड गत आठ वर्षापासून उपस्थित राहून भाविकांसोबत ईश्वर भक्तीचा लाभ घेत आहे.

# माजी सभापती अशोक डक यांचा वाढदिवस विवीध उपक्रमांनी साजरा

माजलगाव। प्रतिनिधी

मुंबई बाजार समितीचे माजी सभापती अशोक डक यांचा वाढदिवस विवीध उपक्रमांनी तालुकाभरात दि.१२ जुन गुरुवार रोजी अजिंक्य मित्र मंडळाच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

माजी सभापती अशोक डक यांच्या वाढदिवसानिमीत्त सकाळी ९:०० वाजता शासकीय रूग्णालयात फळ वाटप,१०:०० वाजता देवखेडा येथील गोशाळेत गाईंना चारावाटप, ११:०० वाजता शहरातील भिमनगरमधील जिल्हा परिषदेच्या शाळेतील चिमुकल्यांना शालेय साहित्याचे वाटप, तालुक्यातील सांडस चिंचोली येथे क्रिकेट स्पर्धांचे उद्घाटन करण्यात आले तर दुपारी १:०० वाजता पालावर राहणा-या गरजु,गरिब महिलांना साडी व अन्नदानाचे वाटप करण्यात आले तर दि.१३ जुन गुरुवार रोजी जन्म घेणा-या मुली करीता पाच हजार रूपयांची एफडी त्यांचे नावे बँकेत करून देण्यात येणार आहे.



अशा विवीध समाजोपयोगी कार्यक्रमांनी माजी सभापती अशोक डक यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी बंडू गायकवाड,दिलीप सोळंके, गणेश धुमाळ, मनोज आगे, शशीकांत गायकवाड, बालू घाडगे, राजेश राठोड, रत्नपाल टाकणखार, अजित गायकवाड, अजिंक्य गायकवाड आकाश मायकर यांचेसह कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.



### जानकाबाई रावसाहेब औताडे यांचे निधन

बीड /प्रतिनिधी

येथील सेवानिवृत्त शिक्षक नवनाथ औताडे यांच्या मातोश्री जानकाबाई रावसाहेब औताडे यांचे नुकतेच वृद्धापकाळाने दिनांक १० /०६/२०२५ रोजी दुःखद निधन झाले मृत्यू समय त्यांचे वय ९५ वर्षाचे होते त्यांच्या निधनाबद्दल गावात हळहळ व्यक्त केली जात आहे

# नांदूरघाट शाळा वाचवण्यासाठी तोडगा काढा-शंकर जाधव

बीड । प्रतिनिधी

नांदुर घाट जिल्हा परिषद शाळेसाठी मागील १८ महिन्यांपासून शाळा समितीचे अध्यक्ष अमोल जाधव लढा देत आहेत शासनाची शाळा वाचवण्यासाठी जो लढा उभा करून संघर्ष सुरू आहे तो राज्यात पहिलाच असेल एवढा संघर्ष एक सामान्य शेतकरी व शाळा समितीचा अध्यक्ष लढतोय अशावेळी शासनाने पाठबळ दिले पाहिजे कारण शासनाला जे काम करायचे आहेत ते काम शाळा समितीचे अध्यक्ष व ग्रामस्थ करत आहेत महत्वाचे म्हणजे शासनाचे धोरण पहिली ते पाचवी आहे तरीदेखील नांदूरच्या शाळेला पाचवीच्या वर्गाला विरोध केला जात आहे संस्थेचे लाड पुरवण्यासाठी गावाचा आत्मा जिल्हा परिषद शाळा आहे व या ठिकाणी पहिली ते सातवी जुनी शाळा होती नवीन मान्यता मागितलीच नाही अध्यक्ष अमोल जाधव यांनी बीडमध्ये दोन वेळेस जिल्हा परिषद सिओ कार्यालय शाळा भरवली उपोषण केले फक्त क्षणिक आश्वासन देत होते शेवटी अध्यक्ष यांनी टोकाचे पाऊल घेऊन १४ जून रोजी आत्मदहनाचा इशारा दिला तरी प्रशासनाने आधीच तोडगा काढून काही चुकीची घटना घडण्याच्या आत न्याय द्यावा नसता काही बरे वाईट घडले तर याचे तीव्र पडसाद उमटतील व तालुका भर प्रशासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन उभा केले जाईल व याला सर्वस्वी जबाबदार प्रशासन असेल असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट चे तालुका अध्यक्ष शंकर जाधव यांनी पत्रकार द्वारे प्रशासनाला इशारा दिला आहे.



या ठिकाणी गोरगरिबांच्या लेकरांच्या शिक्षणाचा प्रश्न आहे शेतकऱ्यांच्या कष्टकऱ्यांच्या लेकरांना प्रशासनाला शिकून द्यायचे नाही का हजारो रुपयाची फीस पहिलीपासून कुठे भरणार हा लढा आता येत्या अमोल जाधवचा नसून पूर्ण गावाचा पूर्ण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा पालकांचा व सर्वसामान्यांचा झाला आहे व अमोल जाधव यांच्या पाठीशी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तसेच कष्टकरी शेतकरी पालक हे तालुक्यातील आहेत भविष्यात काही घटना घडली तर याचे परिणाम खूप मोठे भोगावे लागतील त्यामुळे प्रशासनाने तात्काळ याची दखल घ्यावी नसता प्रत्येक ठिकाणी मोठे आंदोलन उभा राहील असे तालुकाध्यक्ष शंकर जाधव यांनी म्हटले आहे

# ज्योतीताई, मेटे साहेबांच्या नावाखातर तरी आयटीआयकडे लक्ष द्या

### विद्यार्थी आणि पालक फिरवताहेत पाठ युसूफ़

बीड। प्रतिनिधी

जिल्ह्यातील २८ आयटीआयमध्ये ३१४० जागा असताना आतापर्यंत फक्त २५०० विद्यार्थ्यांचेच अर्ज आले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांनी आयटीआय कडे पाठ फिरवली की काय असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.विद्यार्थी आणि पालकांमध्ये आयटीआय बद्दल दिसून येत असलेली अनास्था एक तर येथे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण दिले जात नाही. विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीवर शिक्षकांचा आणि शिक्षकांच्या अनुपस्थितीवर प्राचार्यांचा कुठलाही अंकुश नाही. वर कहर म्हणजे येथून काहीतरी वेडेवाकडे शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना रोजगारही मिळत नाही. अशी कारणे समोर येत आहेत. ही बाब लक्षात घेता येथील विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण देणे. विद्यार्थ्यांसह शिक्षकांच्या नियमित उपस्थिती वर भर देणे. येथील शिक्षकांनी न शिकविताही उत्तीर्ण होऊन सनद घेत बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक असताना आयटीआय व्यवस्थापनाकडून मात्र या बाबीकडे दुर्लक्ष करून इतर बाबींचाच आटापिटा करण्यात येत असल्याचे बोलले जात आहे. एक वेळ अशी होती जेव्हा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये नंबर लागावा म्हणून विद्यार्थ्यांसह पालकही अक्षरशः देव पाण्यात घालायचे आज विद्यार्थी मिळावी म्हणून आयटीआयच्या इन्स्ट्रक्टरांना दारोदारी फिरावे लागत आहे. ही अवस्था सुधारण्यासाठी ज्योतीताई मेटे यांनी आता बीड च्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडे लक्ष द्यावे. कारण या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला दिवंगत विनायकराव मेटे यांचे नाव देण्यात आले आहे. निदान मेटे साहेबांच्या नावाखातर तरी ज्योती ताईंनी लक्ष देणे गरजेचे आहे असे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी म्हटले आहे.




बीडच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेबद्दल अनेक जागरूक पालक आयटीआय व्यवस्थापनाकडे तक्रारी करत असूनही त्याची नोंद घेतली जात नसल्याचे बोलले जात आहे. मोठ्या आशेने या प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर हा सर्व प्रकार अन्यायकारक आहे. सर्वसामान्य गोरगरीब कुटुंबातील पालक आपल्या पाल्यांना शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत मोठ्या आशेने यासाठी टाकतात की ते काहीतरी व्यवसायिक औद्योगिक प्रशिक्षण घेऊन येथून बाहेर पडतील आणि आपले आयुष्य चांगले स्थिरस्थावर जगण्याकरिता स्वयं रोजगार करतील किंवा येथून मिळविलेल्या शिक्षणाच्या बळावर औद्योगिक क्षेत्रात नोकरीस तरी लागतील. असे पूर्वी व्हायचे परंतु गेल्या काही वर्षांपासून मात्र पालकांच्या या धारणेचा पार बट्ट्याबोळ झाला आहे. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चालविण्यासाठी जे गांभीर्य शासन-प्रशासनाने दाखवायला हवे ते दाखविले जात नाही. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेबद्दल शासन-प्रशासनाला आस्था राहिली नसल्याचेही बोलले जात आहे. तसेच येथून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना रोजगारही उपलब्ध होत नाहीये. यामुळे येथे प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस रोडावत चालल्याचेही बोलले जात आहे. तसेच विद्यार्थ्यांना पिण्यासाठी आयटीआय मध्ये साधे पाणी सुद्धा नाही. एवढ्या अनास्थे आणि दुर्लक्षतेने ही शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चालविली जात आहे. यामुळे आता ज्योतीताई यांनी निदान मेटे साहेबांच्या नावाखातर तरी बीडच्या आयटीआय कडे लक्ष द्यावे असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केले आहे.


## जाहीर प्रगटन

### तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय शिरूर कासार, जि. बीड

E-mail.tahasildarshirurkasar@gmail.com
दुरध्वनी क्र.०२४४४-२५९३५९
२०२४/MAG/जन्म/मृत्यू नोंदणी/प्र.क्र.१५९/कावि-२५७
दि ६/८/२०२५

मा. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर का. यांच्या न्यायालयात जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये दाखल जन्म/मृत्यु प्रकरण मध्ये नोंद घेणे बाबत ज्या अर्थी अर्जदार हिराजी तात्याबा नागरगोजे, रा. लिंबा, ता. शिरूर कासार, जि. बीड यांनी त्यांचे वडील नामे तात्याबा पाटीलबा नागरगोजे यांचा मृत्यु दिनांक ०१.०१.१९५९ रोजी लिबा येथे झाल्याची नोंद करणेबाबत या न्यायालयात अर्ज केला आहे.

त्या अर्थी या दिनांका बाबत कोणास आक्षेप असल्यास सदर आक्षेप स्वतः किंवा आपले वकिला मार्फत हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्या पासून १५ दिवसात नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून अर्जाची सूनावणी घेउन नियमाप्रमाणे आदेश केला जाईल.

स्वाक्षरित
तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर कासार

## जाहीर प्रगटन

### तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय शिरूर कासार, जि. बीड

E-mail.tahasildarshirurkasar@gmail.com
दुरध्वनी क्र.०२४४४-२५९३५९
२०२४/MAG/जन्म/मृत्यु नोंदणी/प्र.क्र.१५८/कावि-२५६
दि ६/८/२०२५

मा. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर का. यांच्या न्यायालयात जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये दाखल जन्म/मृत्यु प्रकरण मध्ये नोंद घेणे बाबत ज्या अर्थी अर्जदार हिराजी तात्याबा नागरगोजे, रा. लिंबा, ता. शिरूर कासार, जि. बीड यांनी त्यांची आई नामे सोनाबाई भ्र. तात्याबा नागरगोजे हिचा मृत्यु दिनांक ०१.०१.१९४९ रोजी लिंबा येथे झाल्याची नोंद करणेबाबत या न्यायालयात अर्ज केला आहे.

त्या अर्थी या दिनांका बाबत कोणास आक्षेप असल्यास सदर आक्षेप स्वतः किंवा आपले वकिला मार्फत हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्या पासून १५ दिवसात नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून अर्जाची सुनावणी घेउन नियमाप्रमाणे आदेश केला जाईल.

स्वाक्षरित
तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर कासार


# सांची बुद्ध विहारात पौर्णिमा उत्साहात साजरी

माजलगाव। प्रतिनिधी

शहरापासुन जवळच आसलेले सांची बुद्ध विहार , डॉ आंबेडकर भवन केसापुरी वसाहत येथे भारतीय बौद्ध महासभेच्या वतीन भगवान बुद्धाच्या जिवनातील पौर्णिमांचे महत्व जाणुन वर्षाच्या बाराही पौर्णीमा विविध उपक्रमाने साजरा केल्या जातात याचाच एक भाग म्हणुन जेष्ठ पौर्णिमा मोठ्या उत्साह साजरी करण्यात आली.या निमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्यात्या म्हणुन भारतीय बौद्ध महासभा जिल्हा बीड पुर्व च्या महिला जिल्हा अध्यक्षाकमलताई डोंगरे या होत्या तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते तसेच कार्यक्रमाचे प्रस्तावीक महिला तालुका अध्यक्षा मंदाताई साळवे यांनी केले या ठिकाणी भारतीय बौद्ध महासभा बीड जिल्हा पुर्वचे संस्कार उपाध्यक्ष एस बी मोरे यांनी मार्गदर्शन केले कार्यक्रमाच्या प्रमुख व्याख्यात्या कमलताई डोंगरे यांनी बौद्ध धम्मातील जेष्ठ पौर्णीमेचे महत्व या विषयावर सखोल मार्गदर्शन केले,या कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संस्कार सचिव शाम वाघमारे,आशाताई मोरे,जिल्हा पर्यटन सचिव के व्ही साळवे,एन बी राजभोज,जिल्हा संघटक बी सी डोंगरे,शारदा ताई तांगडे, वंचित बहुजन आघाडीचे भारत तांगडे, अंकुश आण्णा जाधव, श्रीमंत डोंगरे,सदधम्म सेवासंघाचे ट्रस्टी अरुण पोटभरे, नवनाथ गायकवाड,आप्पासाहेब भारस्कर,शेलापुरीचे उपसरपंच नाथा घडसे,पत्रकार किसन भदर्गे, सह परिसरातील धम्म उपासक उपासिका मोठ्या प्रमाणात उपस्तीत होते या कार्यक्रमाला मंदाताई साळवे यांनी भोजनदान दिले तसेच या कार्यक्रमाचे सुत्र संचलन शहर अध्यक्ष प्रा एल आर मस्के यांनी केले तर आभार तालुका कोषाध्यक्ष डी एस साळवे यांनी मानले या ठिकाणी बुद्ध दर्शन सहल करुण आलेल्या धम्म उपासकांचा सत्कार करण्यात आला,या कार्यक्रमासाठी दयानंद साळवे, नितीन डोंगरे, बाबासाहेब घनघाव, चक्रधर पोटभरे, भगवान डोंगरे,मोहन काकडे,बळीराम काकडे,डी पी वाघमारे , डी पी पोटभरे शिवाजी कासारीकर,कोमल डोंगरे,विमल साळवे, वैशाली गायकवाड ,निलावती साळवे,वैभव साळवे सह तालुका पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.



cmyk

राज्य लोकतंत्र

शुक्रवार, दि.१३ जुन २०२५




# अंबाजोगाई नगर पालिकेचा ढिसाळ कारभार

## नागरिकांच्या प्रश्नावर राजकिशोर मोदींनी मुख्याधिकाऱ्यांना धरले धारेवर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहराच्या नागरी समस्यांबाबत प्रशासनाची उदासीनता संपण्याचे नाव घेत नसल्याने अखेर माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी पुढाकार घेत महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर आधारित मागण्यांचे पत्र आज नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना सादर केले. यावेळी मोदी यांनी शहरातील नागरी सोयीसुविधांच्या दुरावस्थेबद्दल मुख्याधिकाऱ्यांना जाब विचारत शहरहितासाठी अनेक तत्त्वपूर्ण मागण्या मांडल्या.

शहरातील सांस्कृतिक व नागरी वापराच्या जागांच्या पारदर्शकतेबाबत प्रशासकीय भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, आद्यकवी मुकुंदराज सभागृह, लोकनेते विलासराव देशमुख सभागृह, एपीजे अब्दुल कलाम सभागृह, सदर बाजारमधील शादी खाना, मुकुंदराज शाळेसमोरील नगरपालिका संकुले सभागृह तसेच एलआयसी ऑफिस मागील स्विमिंग पूल ओपन स्पेस या ठिकाणी भाडेतत्त्वावर चालविल्या जाणाऱ्या व्यवस्थांचा तपशील जाहीर करण्याची स्पष्ट मागणी करण्यात आली आहे. विशेषतः २०१६ सालच्या दरपत्रकांपासून ते आजतागायतचे दर, सामान्य जनतेसाठी आयोजीत कार्यक्रमांना आकारण्यात येणारे भाडे, तसेच यासंबंधित



**नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांबाबत सविस्तर माहिती देण्यासाठी दिले निवेदन**

सर्व कागदपत्रांची सत्यप्रती तात्काळ जनतेसमोर सादर करण्यात याव्यात, अशी आग्रही भूमिका पत्रात मांडण्यात आली आहे.यासोबतच नगर परिषद सर्व विभागांचे वीजबिल भरते का? भरल्यास त्यावर होणारा एकूण खर्च किती आहे, याची माहितीदेखील मागविण्यात आली आहे.

स्वच्छता व पाणीपुरवठा विभागाच्या कारभारातही पारदर्शकतेचा अभाव दिसून येत असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. दिवाबत्ती देखभाल, कंत्राटी कामगार, साहित्य खरेदी व दुरुस्ती, तसेच तुरटी, ब्लिचिंग पावडर यासाठी झालेला खर्च जनतेपुढे मांडावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. नगर परिषदेकडून मालमत्ता कर, पाणीपट्टी, घरपट्टी आणि इतर सेवा करांमधून मागील तीन वर्षांत किती महसूल जमा झाला, त्याचे विश्लेषण जनतेसमोर मांडावे, अशी नागरिकांची भूमिका पत्राद्वारे अधोरेखित करण्यात आली आहे.

शहरात सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या कामकाजावरही गंभीर प्रश्न उपस्थित करताना सध्या पाणीपुरवठा अभियंता नसल्याने तांत्रिक कामकाज संगणक अभियंता आणि लिपिकांकडून पाहिले जात असल्याने कार्यक्षमतेवर परिणाम होत असल्याची टीका करण्यात आली. ही कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून पूर्ण करावीत किंवा तात्काळ पात्र अभियंत्याची नेमणूक करावी, अशी ठाम मागणी मोदी यांनी पत्रात केली आहे. त्याचबरोबर अंबाजोगाई नगर परिषदेच्या स्वच्छता विभागातील कंत्राटी कामगारांना मागील तीन ◀◀ पान ३ वर

## श्री.क्षेत्र गहिनीनाथ गड संस्थानात मानाचे शुभ्र अश्व अर्पण सोहळा थाटात पार पडला

**माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या वतीने अश्व अर्पण; परमपूज्य विठ्ठल महाराजांच्या प्रमुख उपस्थितीत धार्मिक विधी संपन्न**

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील प्रसिद्ध व श्रद्धास्थान असलेल्या श्री. क्षेत्र गहिनीनाथ गड संस्थान येथे एका विशेष धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या वतीने गड संस्थानास मानाचे दोन पांढरे शुभ्र अश्व अर्पण करण्यात आले. या अश्वांचे परमपूज्य ह.भ.प. श्री विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या प्रमुख उपस्थितीत विधीवत पूजन व स्वागत करण्यात आले.

संपूर्ण कार्यक्रम दरम्यान मंत्रोच्चार, भजन, कीर्तन व पारंपरिक वाद्यांच्या गजरात भाविकांनी भक्तिभावाने सहभाग घेतला. या पूजेसाठी विविध भागांतून आलेले शेकडो



भक्तगण, ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून युवा नेते डॉ. अजय दादा धोंडे, जि.प. सदस्य रामराव खेडकर, ◀◀ पान ३ वर

## रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी प्रा.रोहिणी पाठक तर सचिवपदी मंजुषा जोशी

**रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीची नविन कार्यकारिणी जाहिर**

अंबाजोगाई । प्रतिनिधी

रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या अध्यक्षपदी प्रा.रोहिणी पाठक यांची तर सचिवपदी मंजुषा जोशी यांची सन २०२५-२०२६ या नविन वर्षासाठी निवड करण्यात आली आहे.

रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी ही संस्था गेल्या अनेक वर्षांपासुन अंबाजोगाई शहर व परिसरात सातत्याने विविध सामाजिक उपक्रम राबविले. उपेक्षीत व वंचितासाठी रोटरी क्लबचे विविध प्रकल्प सातत्याने कार्यरत असतात. याही वर्षी रोटरी क्लबची सन २०२५-२०२६ या





कालावधीसाठी नविन कार्यकारीणी जाहिर करण्यात आली आहे. यात अध्यक्ष- प्रा.रोहिणी पाठक, उपाध्यक्ष- धनराज सोळंकी, सचिव- मंजुषा जोशी, सह सचिव-राधेश्याम लोहिया कोषाध्यक्ष सचिन बेंबडे, क्लब ट्रेनर विश्वनाथ लहाने,कल्याण काळे,डॉ. निशिकांत पाचेगावकर,क्लब ॲडमिन जगदीश जाजू ,सार्जंट डॉ अनिल केंद्रे,द रोटरी फाउंडेशन डायरेक्टर डॉ नवनाथ घुगे, तर कार्यकारिणी सदस्य म्हणून सुनंदा मुंदडा, ॲड. अमित गिरवलकर,ग्रँट प्रोजेक्ट डायरेक्टर आनंद कर्णावट, पुरुषोत्तम रांदड, संतोष मोहिते, मोइनशेख, स्वप्नील परदेशी, डॉ बाळासाहेब लोमटे, प्रा रमेश सोनवलकर,आनंद जाजू,स्वरूपा कुलकर्णी, बालाजी घाडगे, प्रा शैलजा बरुरे,राजेंद्र घोडके,भीमसेन ◀◀ पान ३ वर

## जिल्हा माहिती अधिकाऱ्यामार्फत माहिती संचालकांना पत्रकारांसाठीच्या योजनांच्या नियमात सुधारणा करणे बाबत सूचनांचे निवेदन

बीड । प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषद बीड जिल्हा शाखेच्या वतीने बीड जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर यांच्यामार्फत माहिती व जनसंपर्क विभाग मंत्रालय मुंबईचे संचालक डॉ. गणेश मुळे यांना पत्रकारांसाठीच्या योजनांच्या नियमात सुधारणा करणे बाबत निवेदन देण्यात आले या निवेदनात पत्रकारांच्या योजनांसाठी असलेल्या जाचक अटी काढून टाकाव्यात अशी मागणी करण्यात आली आहे.

मराठी पत्रकार परिषद गेल्या अनेक दिवसापासून पत्रकारांसाठीच्या विविध



योजनांच्या आटी आणि नियमात बदल करावेत अशी मागणी सातत्याने करत आहे. या मागणीची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दखल घेऊन यात काही सुधारणा करण्याची तयारी दाखवली आहे. यात काय बदल अपेक्षित आहेत. अशा सूचना करणारे निवेदन जिल्हा माहिती अधिकाऱ्यांच्या मार्फत संचालक डॉ. गणेश मुळे यांना देण्यात आले या निवेदनामध्ये आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेसाठी वयाची अट ५८ वर्ष व अनुभवाची अट २५ वर्षे करावी. सलग तीस वर्षे सेवा ही अट रद्द केली जावी. ज्यांच्याकडे विना खंड सलग तीस वर्षे अधिस्वीकृती पत्रिका आहे आणि ज्यांचे वय ५८ वर्ष आहे अशा पत्रकाराला सन्मान योजनेचा लाभ दिला जावा. महाराष्ट्रात असंख्य पत्रकार असे आहेत की त्यांच्याकडे तीस वर्षांपूर्वीची कागदपत्रे मिळत नाहीत. त्यामुळे पत्रकार योजना पासून ते वंचित राहतात. अशा स्थितीत जिल्हा माहिती अधिकारी आणि जिल्हा मराठी पत्रकार संघाचे शिफारस पत्र ग्राह्य समजले जावे. शिवाय संबंधित पत्रकाराचे प्रतिज्ञापत्र घेतले जावे.

◀◀ पान ३ वर

## भाकपचे बीड जिल्हा अधिवेशन संपन्न

**कॉ.भाऊराव प्रभाळे यांची जिल्हा सचिवपदी एकमताने फेरनिवड**

बीड । प्रतिनिधी

दिनांक १२ जून भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे बीड जिल्हा त्रैवार्षिक अधिवेशन आज दिनांक १२ जून २०२५ रोजी बीड शहरातील हॉटेल नीलकमल येथे सुमारे १३७ प्रतिनिधी आणि भा क.प चे राज्य सचिव कॉ.सुभाष लांडे, राज्य सचिव मंडळ सदस्य कॉम्रेड नामदेव चव्हाण आदींच्या उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी सर्वानुमते जिल्हा सचिव म्हणून कॉम्रेड भाऊराव प्रभाळे यांची फेरनिवड पुढील तीन वर्षासाठी करण्यात आली. याबाबत अधिक असे की भारतीय कम्युनिस्ट पक्ष





बीड अधिवेशन हॉटेल नीलकमल येथे संपन्न झालेल्या अधिवेशनात राज्यसचिव कॉ. सुभाष लांडे यांचे उद्घाटन पर भाषण झाले यावेळी बोलताना कॉ लांडे यांनी ग्रामीण, कष्टकरी, शेतकरी, मजूर वर्गाच्या समस्या सोडविण्यासाठी सरकारच्या विरोधातील संघर्ष घट्ट करण्याचे आव्हान केले. यावेळी अनेक मान्यवरांनी पक्षाच्या राजकीय, संघटनात्मक आणि भविष्यातील चर्चा करण्यात आली अहवालामध्ये असलेल्या त्रुटी व दुरुस्ती सुचवल्या यावेळी अनेक राजकीय ठराव भविष्यकालीन ◀◀ पान ३ वर

## पोलिस व्हॅन व खासगी वाहनांमधून वाहतूक केलेले बॉक्स कशाचे? खुलासा करा

**पोलिस अधिक्षक काँवत यांच्याकडे वंचितचे अजय सरवदे यांची तक्रार**

बीड । प्रतिनिधी

दिनांक १२.०६.२०२५ रोजी मध्यरात्री १ वाजून १५ मिनिटांनी बीडमधील छत्रपती शिवाजी महाराज चौका पासून फक्त २ किलोमीटर अंतरावर सोलापूर हायवेवर पेट्रोल पंपासमोर एका पोलिस व्हॅनमधून एका खाजगी गाडीत जिचा नंबर २३७९३ मध्ये पोलिस ४ ते ५ बॉक्स उतरवून पोलिस गाडी घेऊन गेले आणि ती खाजगी गाडी पण माल घेऊन






त्यांच्या १० मिनिटाने निघून गेली. पोलिस व्हॅनमध्ये नेमके काय होते? जे इतक्या रात्री एका खाजगी ◀◀ पान ३ वर

## बच्चु कडू यांच्या आंदोलनास शेतकरी संघर्ष समितीचा पाठिंबा -भाई थावरे

माजलगाव । प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमाफी सह इतर मागण्यांसाठी प्रहार संघटनेचे प्रमुख माजी आमदार बच्चू कडू यांनी अमरावतीच्या गुरुकुंज मोझरी येथे अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. कडू यांच्या आंदोलनाला शेतकरी संघर्ष समितीने भाई गंगाभिषण थावरे यांच्या नेतृत्वाखाली पाठिंबा दर्शविला आहे. कडू यांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ



दि १५ जुन रविवार रोजी आनंदगावमध्ये रॅली काढून दोन तास निदर्शने करण्यात येणार असल्याचे भाई थावरे यांनी सांगितले.

कर्जमाफीसह विविध शेती प्रश्नांच्या मुद्यावरुन प्रहार जनशक्ती संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांचे अन्नत्याग उपोषण सुरु आहे.दि १२ जुन गुरुवार रोजी या उपोषणाचा पाचवा दिवस आहे. माजी आमदार बच्चू कडू यांच्या आंदोलनास ◀◀ पान ३ वर

## आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरकडे जाणाऱ्या पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी महत्त्वपूर्ण बैठक

पाटोदा । प्रतिनिधी

आषाढी एकादशी निमित्त पाटोदा शहरातून पंढरपूरकडे पायी निघालेल्या वारकऱ्यांच्या पालखी सोहळ्याचे भव्य स्वागत करण्यासाठी पाटोदा नगरपंचायतीच्या वतीने एक महत्त्वपूर्ण बैठक आज नगरपंचायत कार्यालयात संपन्न झाली. या बैठकीत पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी विविध नियोजनांवर सखोल चर्चा करण्यात आली. नगराध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस सभापती, नगरसेवक,प्रशासन अधिकारी,विविध सामाजिक व स्वयंसेवी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. वारकऱ्यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आरोग्य तपासणी, अन्नछत्र, आरोग्य शिबीर, वाऱ्याची व विद्युत व्यवस्था याबाबत ठोस निर्णय घेण्यात आले.यावेळी नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव यांनी सांगितले की, ''ही परंपरा आपल्या शहराची आध्यात्मिक आणि सांस्कृतिक ओळख आहे. पालखी सोहळा हा केवळ धार्मिक उत्सव नसून सामाजिक एकतेचे प्रतीक आहे.पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी नगरपंचायत सर्वतोपरी तयारी करत आहे.''

नगरपंचायत स्वच्छता विभागाकडून मार्गावर विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे.या बैठकीने पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी एक मजबूत आराखडा तयार केला असून, पाटोदा शहरातील सर्व नागरिकांनी पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी छत्रपती शिवाजी महाराज चौक येते मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव यांनी केले आहे.

## आधिस्वीकृतीधारक पत्रकारांच्या बस सवलतीसाठी परिवहन मंत्री सरनाईक यांना मराठी पत्रकार परिषदेचे निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील सर्व आधी सुकृती धारक पत्रकारांना नवीन आलेल्या इलेक्ट्रॉनिक शिवाई व स्लीपर सेमी स्लीपर कोच मध्ये सवलत मिळावी या मागणीसाठी बीड जिल्हा मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना निवेदन देण्यात आले. बीड जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर यांनी हे निवेदन



दिले. यावेळी उपमुख्यमंत्री आरोग्य सुविधा प्रमुख बाजीराव चव्हाण यांची उपस्थिती होती.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना दिले निवेदनात मराठी पत्रकार परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे की महाराष्ट्र शासनाच्या वतीने अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना बस प्रवास मोफत दिला जातो. मात्र सध्या महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडे नवीन इलेक्ट्रिक शिवाई बस आलेल्या आहेत. या गाड्यांना पत्रकारांसाठी मोफत बस प्रवास सवलत दिली जात नाही. याशिवाय महामंडळाच्या सेमी- ◀◀ पान ३ वर

## शासनाने निर्धारित केलेल्या नियमानुसार शाळा भरवा - मनोज जाधव

**शाळा ९ वाजता भरवा; शाळांचा वेळ साडेपाच तासांपेक्षा अधिक नको**

बीड । प्रतिनिधी

शासनाने निर्धारित केलेल्या नियमांचे बीड मधील इंग्रजी शाळा पालन करत नाहीत. या संदर्भात शिक्षण विभागाला वारंवार निवेदनाद्वारे मागणी करूनही शिक्षण विभाग ही या शाळांवर कसलीही कारवाई करत नाही. शासन निर्णयानुसार शाळा सकाळी ९ वाजता भरवणे बंधनकारक आहे. शाळांच्या वेळा साडेपाच तासांपेक्षा अधिक



असू नयेत, असा नियम असताना देखील नियमाची पायमल्ली केली जात आहे आणि शिक्षण विभागा कडून कसलीही कारवाई होत नसल्याने शाळांची मनमानी सुरूच आहे. तेव्हा शिक्षण विभागाने मनमानी करणाऱ्या शाळांवर कारवाई करण्याची मागणी शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केली आहे.

शाळा भरण्याची वेळ आणि शाळांच्या तासिकेच्या वेळा याची शासन निर्णयानुसार सांगड घालने गरजेचे आहे. जेणे करून शासन जो शाळेच्या वेळांमध्ये सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न करत आहे ते उद्दिष्ट पूर्ण होईल. मात्र बीडमध्ये शासनाने घालून दिलेल्या नियमापेक्षा शाळेला जेव्हा वाटेल त्यावेळी शाळा भरवली जाते आणि सोडली जाते. या शाळा सहा ते सात तासापर्यंत सुरू ठेवल्या जातात, बीड जिल्ह्यातील शाळांच्या वेळा सकाळी लवकर आणि प्रमाणापेक्षा ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
शुक्रवार, दि.१३ जुन २०२५ । पान ७

# हिंजवडीतील कामांना प्राधान्य द्या;

## ‘पीएमआरडीए’चे आयुक्त योगेश म्हसे यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

**पिंपरी । प्रतिनिधी**

हिंजवडी भागातील नागरिकांना दिलासा मिळेल, अशा कामांना प्राधान्य देण्याचे आदेश पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणचे (पीएमआरडीए) आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी संबंधित प्रशासकीय यंत्रणांना दिले.




हिंजवडी, माण, मारुंजी यासह इतर काही भागात ठिकठिकाणी पावसाचे पाणी साचत असल्याने वाहनचालकांसह नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर पीएमआरडीए कार्यालयात आयुक्त योगेश म्हसे यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी आमदार शंकर मांडेकर, पीएमआरडीए विकास व परवानगी विभागाचे संचालक सुनील मरळे, मुख्य अभियंता रिनाज पठाण, जमीन व मालमत्ता विभागाचे सह आयुक्त हिम्मत खराडे, अनधिकृत बांधकाम व निर्मूलन विभागाच्या उपजिल्हाधिकारी डॉ. दीप्ती सूर्यवंशी - पाटील आदींसह एमआयडीसी, एमपीसीबी, पुणे आयटीसीटी मेट्रो रेल लिमिटेड, जिल्हा परिषद, एमएसईडीसीएल, हिंजवडी इंडस्ट्रिअल असोसिएशन, पीसीएमसी, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंजवडीतील कंपन्यांचे प्रतिनिधी, सोसायटच्यांचे पदाधिकारी, एमएसईटीसीएल, वाहतूक पोलिस, हिंजवडी, माण, मारुंजी या ग्रामपंचायतीचे सरपंच यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

ओढे - नाल्यांतील पाण्याचा प्रवाह रोखल्यामुळे प्रामुख्याने या समस्या पुढे येत आहेत. त्यामुळे प्रशासकीय स्तरावरील सर्व यंत्रणांनी सामूहिक प्रयत्न करून ओढे - नाल्यांची स्वच्छता करत रस्त्यावरील राडारोडा तातडीने उचलून घेण्याचे आदेश यावेळी आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी दिले. हिंजवडी भागात सुरू असलेल्या मेट्रोसह इतर कामांमुळे रहदारीस अडचणी ठरत आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणेने आपली कामे निर्धारित वेळेत पूर्ण करावीत. यासह नागरी समस्या सोडविण्याच्या दृष्टीने सर्व प्रशासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, अशी कामे १५ जूनपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश या बैठकीत म्हसे यांनी दिले.

**नाल्याचा प्रवाह रोखणाऱ्यांवर कारवाई**

हिंजवडी, माण, मारुंजी यासह इतर भागातील नैसर्गिक नाल्यातील पाण्याचा प्रवाह रोखणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे. नाल्याभोवती उभारण्यात आलेल्या बांधकामांचा सर्व्हे करून संबंधित बांधकामे अधिकृत आहेत की अनधिकृत, याचा अहवाल तातडीने सादर करावा. अनधिकृत बांधकामे तातडीने पाडण्याचे निर्देश महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी बैठकीत दिले. यासह काही कंपन्या दूषित पाणी नाल्यात सोडत असल्यामुळे नागरिकांना त्रास होतो. अशा कंपन्यांची चौकशी करावी, त्यांची बांधकामे अनधिकृत असेल तसेच शासनाच्या नियमांचे उल्लंघन करत असेल तर त्यांच्यावर कारवाई करावी, त्यांचा पाणी व वीजपुरवठा खंडित करण्याचे आदेश आयुक्त डॉ. म्हसे यांनी दिले.

# दस्त नोंदणीतील फसवणूक रोखा; गैरप्रकार होत असल्याने महसूल विभागाचे आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

एक जिल्हा एक नोंदणी या सुविधेमध्ये नागरिकांना एकाच जिल्ह्यातील कोणत्याही दुय्यम निबंधक कार्यालयात काही ठराविक दस्तांची नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. मात्र, या प्रणालीमध्ये काही गैरप्रकार आणि अनियमितता होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

वा पाश्र्वभूमीवर दस्तनोंदणी करताना गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींकडून नागरिक व शेतकरी यांची फसवणूक होणार नाही, याची काळजी घ्यावी. असे आदेश महसूल विभागाने दिले आहेत. दस्त नोंदणीतील फसवणूक आणि अनियमितता रोखण्यासाठी नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाने दिलेल्या सूचना व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे, असे आदेशही शासनाने सर्व दुय्यम निबंधकांना दिले आहेत.

# अपघातास जबाबदार असलेली अवजड वाहने होणार जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

अवजड वाहनांमुळे शहरात झालेल्या गंभीर अपघातांच्या पार्श्वभूमीवर डंपर, ट्रक, सिमेंट मिक्सर अशा वाहनांवर कडक कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गेल्या पाच वर्षांत गंभीर स्वरुपाच्या अपघातास जबाबदार असलेल्या अवजड वाहनांची माहिती



संकलित करण्यात येणार असून अशी वाहने जप्त करण्यात येणार आहेत. संबंधित वाहनचालकांचा परवानाही रद्द केला जाणार आहे, असा इशारा पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी बुधवारी (दि.११) दिला.

मार्केट यार्डातील गंगाधाम चौकात ट्रकच्या धडकेत दुचाकीवरील सहप्रवासी दीपाली सोनी या माहिलेचा मृत्यू झाला. अपघातात दीपालीचे सासरे गंभीर जखमी झाले. या अपघातांच्या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी अवजड वाहने तसेच चालकांवर कडक कारवाईचा इशारा दिला. शहरातील प्रमुख रस्त्यांवर अवजड वाहनांना बंदी असताना अनेक वाहनचालक नियमभंग करीत आहेत.

यातून वाहतूक कोंडी तसेच गंभीर अपघात होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. गेल्या वर्षी शहरात ३३४ प्राणांतिक अपघात (फेटल क्सिडेंट) झाले. या अपघातात ३४५ जणांचा मृत्यू झाला. गेल्या पाच महिन्यांत शहरातील वेगवेगळ्या भागात झालेल्या अपघातात १३३ जणांचा मृत्यू झाले आहेत. पोलिसांकडून नियमांचे उल्लंघन वाहनचालकांविरूद्ध कडक कारवाई करण्यात येणार आहे. परवाना रद्द करणे, वाहन जप्त करणे आणि न्यायालयीन कारवाईचा समावेश असणार आहे, असे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी नमूद केले.

# महापालिका निवडणुकीसाठी शिंदे गट सज्ज; धंगेकरांचा स्वबळाचा नारा

**पुणे । प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांसाठी सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. पक्षप्रमुखांपासून पदाधिकारी, कार्यकर्तेही तयार झाले आहेत. ‘स्वबळावर लढण्याचा’ नारा देत शिंदे गटाच्या शिवसेनेनेही तयारी सुरू केली आहे.



महायुती होणार की नाही, याबाबत अद्याप स्पष्टता नसली तरी, प्रत्येक पक्ष आपापल्या स्तरावर निवडणुकीची तयारी सुरू ठेवत आहे. पुण्यातही शिंदे गटाने सर्वच महापालिका जागांवर लक्ष केंद्रित करत मोर्चेबांधणी सुरू केली आहे. वेळ पडल्यास आम्ही स्वबळावर निवडणूक लढवण्यास तयार आहोत, असे स्पष्ट संकेत शिंदे गटाचे पुण्याचे महानगरप्रमुख रवींद्र धंगेकर पुणे महापालिकेच्या आगामी निवडणुकांसंदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. या बैठकीत शिंदे गटाचे महानगरप्रमुख रवींद्र धंगेकर यांनी पक्षाच्या तयारीबाबत माहिती दिली. या वेळी कार्यकर्त्यांनी शिंदे साहेबांना पुण्यात सेनेचा वाढता प्रभाव, माजी नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांचा पक्षात प्रवेश करण्याचा कल याबाबत माहिती दिली. अनेक माजी नगरसेवक आणि पदाधिकारी शिंदे गटात सहभागी होण्यासाठी उत्सुक असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. धंगेकर म्हणाले की, ‘पुणे महापालिकेतील सर्वच्या सर्व जागांवर लढण्याची आमची तयारी सुरू आहे. प्रत्येक प्रभागात उमेदवार उभे करण्याच्या दृष्टीने नियोजन सुरू असून, एकनाथ शिंदे साहेबांनी आदेश दिल्यास आम्ही सर्व जागा स्वबळावर लढण्यास सज्ज आहोत.’ पुण्यातील कार्यकर्ते १६५ जागांवर लढण्यासाठ सक्षम आहेत. सैन्य तयार आहे, फक्त आपल्या आदेशाची वाट पाहत आहेत. पक्षप्रवेशासाठी अनेक लोक संपर्क करत आहेत. बैठका देखील सुरू आहेत. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जाण्यासाठी अनेक जण उत्सुक आबेत. त्यामुळे भविष्यात एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश पाहायला मिळतील, अशी माहिती एकनाथ शिंदे यांना देण्यात आली आहे.

# विजेच्या धक्क्याने कंत्राटी कामगाराचा मृत्यू

**खेड । प्रतिनिधी**

दुरुस्तीच्या कामासाठी विद्युत खांबावर चढलेल्या २८ वर्षीय कंत्राटी कामगाराचा मृत्यू झाला. काम करत असताना अचानक विजेचा धक्का लागुन हा युवक खाली पडला. गुरुवारी (दि. १२) पहाटे सव्वातीन वाजेच्या सुमारास राजगुरुनगर जवळच्या चांडोली परिसरात ही घटना घडली. अजित शिवाजी टाकळकर (वय २८, रा. टाकळकरवाडी, ता. खेड) असे या कंत्राटी कामगाराचे नाव आहे. या घटनेबाबत खेड पोलिस ठाण्यात आकस्मित मृत्यूची नोंद झाली आहे.



या घटनेची माहिती अशी की, चांडोली गावाच्या हद्दीत पुणे-नाशिक महामार्ग बाह्यवळण रस्त्यालगत असणाऱ्या रोहित्रावर बिघाड झाला होता. त्याची दुरुस्ती करण्यासाठी पहाटे सव्वातीन वाजेच्या सुमारास अजित टाकळकर खांबावर चढला होता. अचानक विजेचा जोरदार धक्का बसल्याने तो थेट भीमा नदीपात्रालगत असणाऱ्या गाळात कोसळला. इतर सहकाऱ्यांनी त्याला तात्काळ उपचारासाठी रुग्णालयात हलवले; मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

अजित टाकळकर हा राजगुरूनगर उपविभागामध्ये गेली पाच वर्षे कंत्राटी कामगार म्हणून तुटपुंज्या वेतनावर काम करीत होता. कुटुंबातील तरूण व कर्ता मुलगा मृत पावल्याने दु:खाचा डोंगर कोसळला आहे. त्याच्या मृत्यूची माहिती कळल्यावर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# ‘पुणे महापालिकेतील समाविष्ट गावांना तातडीने आवश्यक पाणी पुरवठा करा’; सभापती प्रा. राम शिंदेंच्या सूचना

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिकेने २०१८ पासून समान पाणी पुरवठा योजना आणली. मात्र, अद्याप कात्रज, कोंढवा, येवलेवाडी, पिसोळी या विभागात अपुऱ्या प्रमाणात पाणीपुरवठा होत आहे. ही बाब गंभीर असून, पुणे महापालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांना तातडीने योग्य प्रमाणात पाणी पुरवठा होईल, या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिले.



विधानपरिषदेचे सदस्य आमदार योगेश टिळेकर यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२५ मध्ये ‘लक्षवेधी’च्या माध्यमातून या प्रश्नाकडे लक्ष वेधले होते. यासंदर्भात सभापती प्रा. शिंदे यांनी आपल्या दालनात बैठक घेऊन याबाबत निर्देश दिले. या बैठकीस विधानपरिषदेचे सदस्य आमदार योगेश टिळेकर, विधानमंडळाचे सचिव डॉ.विलास आठवले, पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम (दूरदृष्य प्रणालीद्वारे), अतिरिक्त महापालिका आयुक्त ओमप्रकाश दिवटे, उप सचिव नगरविकास प्रियंका छापवाले उपस्थित होते.

सद्य:स्थितीत पुणे महापालिकेला १४ टीएमसी पाणी देण्याचा करार करण्यात आला आहे. आता नवीन ३४ गावांसाठी पाणी पुरवठा योजना तयार करताना २१ टीएमसी उपलब्ध करुन देण्याचा करार करावा. सन २०१८ मध्ये सुरु झालेली समान पाणी पुरवठा योजना अद्याप अपुरी असून, गांभीर्याने नियोजन करुन लवकरात लवकर हा पाणी प्रश्न सोडवावा, असे निर्देश प्रा. शिंदे यांनी दिले.

# खडकवासला साखळीत १८.२८ टक्के साठा; पाणी साठ्यात घट

**वेल्हे । प्रतिनिधी**

पुणे शहर व परिसरासह जिल्ह्याला पाणीपुरवठा करणार्या खडकवासला धरण साखळीतील चारही धरण क्षेत्रात गेल्या चार दिवसांपासून पावसाने उघडीप दिली आहे. त्यामुळे धरणातील पाणी साठ्यात घट झाली आहे. बुधवारी (दि. ११) सायंकाळी पाच वाजता धरण साखळीत ५.३३ टीएमसी म्हणजे १८.२८ टक्के साठा शिल्लक होता.



रायगड जिल्ह्याच्या हद्दीवरील सह्याद्रीच्या डोंगरी पट्ट्यात पावसाळी वातावरण आहे. मात्र, वार्यासह ढग विरळ होऊन ऊन पडत आहे. पावसाची उघडीप व पिण्यासाठी सोडण्यात येत असलेल्या पाण्यामुळे धरणातील पाणी साठ्यात घट सुरू आहे.

रविवार (दि. ८) पासून धरणक्षेत्रात पावसाने उघडीप घेतली आहे. त्यामुळे धरणातील पाण्याची आवक थंडावली आहे. सलग चार दिवस पावसाने उघडप घेतली. त्यामुळे बुधवारी सायंकाळी पाच वाजता धरण साखळीत ५.३३ टीएमसी म्हणजे १८.२८ टक्के साठा शिल्लक होता.

या वर्षी मे महिन्यात मान्सूनपूर्व व मान्सूनच्या पावसाने धरण क्षेत्रात दमदार हजेरी लावली होती. त्यानंतर ऐन मान्सूनमध्ये पावसाने उघडीप दिली आहे. असे असले तरी गतवर्षीच्या तुलनेत धरणसाखळीत पाऊण टीएमसीपेक्षा अधिक पाणी साठा शिल्लक आहे. गेल्या वर्षी ११ जून २०२४ रोजी धरणसाखळीत ४.०८ टीएमसी पाणी होते. गेल्या आठवड्यात बुधवारी (दि. ४) सायंकाळी पाच वाजता धरणसाखळीत ५.५४ टीएमसी पाणी साठा होता. गेल्या ८ दिवसांत पाणी साठ्यात ०.२१ टीएमसीची घट झाली. मान्सूनच्या पावसाने धरणातील पाणीसाठ्यात मोठी वाढ झाली नाही. मात्र, किंचित भर पडल्याने पुणेकरांना थोडा दिलासा मिळाला आहे. तर बुधवारी (दि.११) दिवस अखेर खडकवासलात ४५.७२ टक्के, पानशेतमध्ये १४.२९ टक्के, वरसगावमध्ये २१ .९२ टक्के व टेमघर धरणामध्ये २.५२ टक्के पाणीसाठा होता.

# पालखी सोहळ्यांसाठी पुरंदरमधील वाहतुकीत बदल

**सासवड । प्रतिनिधी**

पुणे ग्रामीण जिल्ह्याच्या हद्दीतून संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा पुणे, दिवेघाट, सासवड, जेजुरी, निरा, लोणंदमार्गे पंढरपूरकडे जातो. तर संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा पुणे ते सोलापूर मार्गाने रोटी घाटमार्गे बारामती, इंदापूर, अकलूज मार्गे पंढरपूरला जाते. या दोन्ही पालखी सोहळ्याच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित राहण्यासाठी या मार्गावरील वाहतुकीत बदल करण्यात येणार आहे.



श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचा आषाढी पालखी सोहळा दि. २२ व २३ जून रोजी सासवड (ता. पुरंदर) येथे दोन दिवस मुक्कामी येणार आहे. यानिमित्त वाहतुकीत मोठे बदल करण्यात आले असून, प्रशासनाकडून सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली आहे.

पालखी २४ जूनला जेजुरी, २५ जूनला वाल्हे व २६ जूनला सातारा जिल्ह्यात प्रवेश करणार आहे. या पार्श्वभूमीवर दिवे घाट परिसर २५ व २६ जून रोजी इतर वाहनांसाठी बंद राहणार आहे, अशी माहिती सासवड पोलिस निरीक्षक ऋषिकेश अधिकारी यांनी दिली.

**पालखी मार्गातील वाहतुकीत बदल**

२२ जून पहाटे २ वाजेपासून ते २४ जून १२ वाजेपर्यंत पुणे ते सासवडकडे येणारी दिवे घाट, बोपदेव घाट मार्गे वाहतूक बंद. पर्यायी मार्ग : खडीमशीन चौक-कात्रज-कापूरहोळ. सासवड बाजूकडून येणारी सर्व वाहतूक गराडे-खेड शिवापूर मार्गे पुण्याकडे येईल. २५ जून पहाटे २ ते मध्यरात्री १२ वाजेपर्यंत पुणे-सासवड-जेजुरी-वाल्हे मार्ग बंद. पर्यायी मार्ग : झेंडेवाडी-पारगाव मेमाणे-सुपे-मोरगाव-निरा. २६ जून पहाटे २ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत, वाल्हे-लोणंद मार्ग बंद. पर्यायी मार्ग : पुणे येथून सासवड-जेजुरी- वाल्हे-निराकडे तसेच निरा येथून पुण्याकडे जाणार्या वाहनांनी सासवड-जेजुरी-मोरगाव या पर्यायी मार्गाचा वापर करावा.

# लोणावळा परिसरात पर्यटकांवर निर्बंध;

## जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांचे प्रतिबंधात्मक आदेश

**लोणावळा । प्रतिनिधी**

लोणावळा परिसरातील पर्यटन स्थळांवर पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी हे आदेश दिले आहे.



लोणावळा परिसरातील एकवीरा देवी, कार्ला लेणी, भाजे लेणी, भाजे धबधबा, लोहगड किल्ला, विसापूर किल्ला, तिकोना किल्ला, टायगर पॉइंट, लायन्स पॉइंट, शिवलिंग पॉइंट, पवना धरण या परिसरात प्रामुख्याने पावसाळी पर्यटनासाठी मोठ्या प्रमाणात पर्यटकांची गर्दी होते. अशावेळी नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून संबंधित ठिकाणी हे आदेश लागू करण्यात आले आहेत. सध्या पावसाळा हंगाम सुरु झाला असून, देश विदेशातून मोठ्या प्रमाणावर पर्यटक लोणावळा व परिसरात भेट देण्यासाठी येत आहेत.

वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलिस अधीक्षक संदीपसिंह गिल यांनी लोणावळा पोलिस ठाणे हद्दीतील पर्यटनस्थळांकडे जाणाऱ्या सर्व रस्त्यांची पाहणी केली होती. लोणावळा परिसरात रस्ते अपघात तसेच पर्यटक बुडाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्यामुळे पर्यटक, नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी ३१ ऑगस्टपर्यंत परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.

# तीन कोटींच्या ऑनलाइन

## फसवणुकीतील तीन आरोपी अटकेत

**पिंपरी । प्रतिनिधी**

शादी डॉट कॉम या मेट्रोमोनिअल वेबसाइटवरुन महिलेशी ओळख करुन लग्नाचे आमिष दाखवत तीन कोटी १६ लाख ७८ हजार ११३ रुपयांची फसवणूक करणाऱ्या तीन आरोपींना पिंपरी चिंचवड सायबर पोलिसांनी दिल्ली-हरियाणा बॉर्डरवरून अटक केली आहे.



रणजित मुन्नालाल यादव (वय २७), सिकंदर मुन्ना खान (वय २१), बबलु रघुवीर यादव (वय २५, तिघेही रा. मंडी गाव, जॉनपूर, दक्षिण दिल्ली) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

पोलीस उपायुक्त डॉ. शिवाजी पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार,आरोपींनी महिलेशी शादी डॉट कॉम या वेबसाइटवरुन संपर्क साधला होता. आरोपीने आपण एका मोठ्या कंपनीत सीइओ असल्याचे सांगितले. विविध कारणे सांगून त्याने १० जुलै २०२३ ते ९ सप्टेंबर २०२४ या कालावधीत फिर्यादीकडून ८१ वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये तीन कोटी १६ लाख रुपये वसूल घेतले. पैसे घेतल्यावर आरोपी गायब झाले आणि व्हॉट्सप, इन्स्टाग्राम कॉलचा वापर करून पोलीसांना गुंगारा देऊ लागले. आरोपींनी एकाच पत्त्यावर ११ बँक खाती उघडून, त्यातून पैसे वेगवेगळ्या ३०० ते ४०० खात्यांत ट्रान्सफर केले होते. रणजित यादवने स्वत:च्या खात्यावर ३६ लाख ९६ हजार रुपये घेतल्याचे उघडकीस आले आहे. बबलु यादवने वेगवेगळ्या एटीएममधून रक्कम काढून मुख्य आरोपीला दिली.

# दौंड डेमूचे लोकल सेवेत रूपांतर करणे लांबणीवर; रेल्वे बोर्डाने प्रस्ताव फेटाळला

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे ते दौंडदरम्यान धावणाऱ्या डेमूचे लोकल सेवेत रूपांतर करण्याचे स्वप्न पुन्हा लांबणीवर पडले आहे. कारण, रेल्वे बोर्डाने दौंडला उपनगरचा दर्जा देण्यास नकार दिला आहे. पुणे रेल्वे प्रशासनाने दौंड स्थानकाला उपनगरचा दर्जा द्यावा, यासाठी प्रस्ताव पाठविला. मात्र, रेल्वे बोर्डाने कोणतेही समाधानकारक उत्तर न देता प्रस्ताव फेटाळला. त्यामुळे आता राज्य सरकारवरच मदार आहे.



पुणे ते दौंडदरम्यान दररोज सुमारे ४० हजार प्रवासी डेमूने प्रवास करतात. गेल्या अनेक वर्षांपासून दौंडमधील प्रवासी पुणे ते दौंड रेल्वेसेवेला उपनगरीय रेल्वे सेवेचा दर्जा देण्याची मागणी करत होते. दोन वर्षांपूर्वी तत्कालीन विभागीय रेल्वे व्यवस्थापक इंदू दुबे यांनी दौंडला उपनगरचा दर्जा मिळावा, यासाठी प्रस्ताव पाठविला. तो रेल्वे बोर्डाने शक्य नसल्याचे सांगत रद्द केला. याचा मोठा फटका दौंडच्या प्रवाशांना बसणार आहे. आता राज्य सरकारने दौंडला उपनगरीय स्थानकाचा दर्जा दिल्यांनतरच रेल्वे प्रशासन उपनगरचा दर्जा देईल. दौंड स्थानकाला लोकलसेवेचा दर्जा मिळावा म्हणून पुणे रेल्वे प्रशासनाने काही उपाययोजना आखल्या होत्या. त्यात सर्व फलाटांची उंची लोकलच्यादृष्टीने बांधणे, लोकलचा फूटबोर्ड व फलाट यांच्यात अंतर न ठेवता फलाटांची रचना केली जाणार होती. याशिवाय अन्य बाबींची पूर्तता केली जाणार होती.